www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

आषाढी एकादशीच्या विठ्ठलमय शुभेच्छा
दैनिक लोकरक्षणाय टीम

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
■ वर्ष - ०२ ■ अंक ६६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, १७ जुलै २०२४ ■ रु. २/-
■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# ठाण्यातील कंत्राटी सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ, कंत्राटी कामगारांचे ठाणे महापालिकेसमोर आंदोलन..

● ठाणे, यश सावंत :




ठाण्यातील कंत्राटी सफाई कामगारांनी ठाणे महापालिका मुख्यालयाबाहेर मंगळवारी सकाळी आंदोलन केले, श्रमजीवी रयत संघटनेच्या वतीने हे आंदोलन छेडण्यात आले. मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदारकडे कार्यरत असलेल्या सुमारे 55 कामगारांवर उपासमारिची वेळ आलीये. मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने कामगारांना कामावरून कमी करण्याचा घाट घातलाय त्यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून सर्व कामगार हवालदिल झालेत.

कामगारांना जानेवारी 2020 पासून वार्षिक रजेचा पगार न देणे ,फायलेरिया विभागातील कामगारांचा दोन महिन्यापासून पगार न देणे, या बद्दल वारंवार पत्रव्यवहार पाठपुरावा करून सुद्धा न्याय मिळत नसल्या मुळे नाईलाजास्तव हे धरणे श्रमजीवी कामगार रयत संघटनेच्या नेतृत्वाखाली छेडण्यात आले. कामगाऱ्यांच्या व नागरिकांच्यास आरोग्याशी खेळ मंडणाऱ्या नियमबाह्या ठेकेदार मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि अरेरावी करणारे बालाजी ट्रान्सपोर्ट या दोन्ही ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे आणि त्यांची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करवी अशी मागणी यावेळी कामगारांनी केलीये.

‘ स्वच्छ ठाणे सुंदर ठाणे ‘ ही संकल्पना डोळयासमोर ठेवून प्रत्येक कामगार ठाणे शहराला सुंदर व स्वच्छ बनविण्याचा प्रयत्न करित असतात, मात्र याच कामगारांवर आता उपासमारिची वेळ आलीये, प्रशासन देखील गाभीर्याने लक्ष देत नसून ठेकेदारांना पाठिशी घालत असल्याचा आरोप कामगारांनी केलाय. यावेळी मोठ्या संख्येने कामगारांनी एकत्र येत आंदोलन छेडले, तर जो पर्यंत मागण्या पुर्ण होणार नाही तो पर्यंत आंदोलन सुरुच राहील असा इशारा यावेळी कामगारांनी दिलाय.

## थोडक्यात

### वरळी हिट अँड रन प्रकरण - मिहीर शाहला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

● पुणे, अभिजित येरल्लू :



मुंबईतील वरळी अपघात प्रकरणातील प्रमुख आरोपी मिहीर शाह याला पोलिसांनी आज (१६ जुलै) पुन्हा एकदा न्यायालयासमोर हजर केलं. न्यायालयाने सर्व पुरावे तपासून, मिहीरने पोलिसांना दिलेला कबुलीजबाब वाचून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तो आता ३० जुलैपर्यंत कोठडीत राहील. मिहीर शाह याने ७ जुलै रोजी (रविवारी) पहाटे वरळी परिसरात मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे बीएमडब्ल्यू (BMW) कार चालवत एका दाम्पत्याला उडवलं होतं. वरळीतील रहिवासी कावेरी नाखवा आणि प्रदीप नाखवा या दोघांना त्याच्या कारने उडवलं होतं. यात प्रदीप नाखवा हे एका बाजूला पडले. तर कावेरी नाखवांना मिहीरने कारबरोबर फरपटत नेलं. या भयंकर अपघातात कावेरी नाखवांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या अपघातानंतर मिहीर फरार होता. मात्र दोन दिवसांच्या शोधमोहिमेनंतर (९ जुलै) मिहीरला अटक करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी त्याला न्यायालयासमोर हजर केलं होतं. न्यायालयाने अधिक चौकशीसाठी त्याची १६ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी केली होती. त्यानंतर आज पोलिसांनी पुन्हा एकदा त्याला न्यायालयासमोर हजर केलं. यावेळी पोलिसांनी मिहीरची आणखी १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडी मागितली, न्यायालयाने ती मंजूर केली आहे.

### अपघातातील जखमी वारकऱ्यांवर शासन उपचार मोफत करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

● नवी मुंबई , रोहित जैसवार :



डोंबिवली येथील घेसरगाव येथून पंढरपूरकडे खासगी बसने निघालेल्या वारकरी भक्तांचा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या भीषण अपघातातील जखमींची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कळंबोली येथील महात्मा गांधी मिशन रुग्णालयात प्रत्यक्ष भेट घेऊन पाहणी केली. या दूर्घटनेत दूदैवाने मृतपावलेल्या वारकऱ्यांच्या कुटूंबीयांना शासनाकडून ५ लाख रुपयांची मदत देण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जखमींची विचारपूस केली तसेच मुख्यमंत्री शिंदे यांनी एमजीएम रुग्णालयातील डॉक्टरांकडून जखमी वारकऱ्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

पान २ वर

### पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली १८ जुलै रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन

● पालघर, विशाल पाटील :

सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरुवार दिनांक १८ जुलै रोजी, सकाळी ११.०० वाजता नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात आली आहे.

# भरती ३०० जागांसाठी अन् जमले हजारो तरुण

## एअर इंडियाच्या गेटपुढे मोठा गोंधळ !



● मुंबई, विशाल कारंडे :

सरकारी नोकर होण्यासाठी आज महाराष्ट्रातील लाखो तरुण दिवसरात्र धडपड करत आहेत. सरकारी नोकरी भेटली नाही तरी खासगी क्षेत्रात चांगला पगार देणारी एखादी प्रतिष्ठेची नोकरी मिळावी, अशी अशा घेऊन हे तरुण कष्ट उपसत आहेत. राज्य तसेच केंद्र सरकारकडून राबवल्या जाणाऱ्या अनेक पदांच्या भरती प्रक्रियेत गोंधळ उडाल्यामुळे या तरुणांमध्ये हतबलता आलीय. म्हणूनच एखाद्या ठिकाणी भरती प्रक्रिया राबवली जात असेल तर तरुणांची झुंबड उडताना दिसतेय.

पान २ वर

# राजकारण थांबवा! सलोखा राखा! - नारायण राणे

● मुंबई, विशाल कारंडे :



राज्यातील काही नेत्यांकडून किरकोळ राजकीय फायद्यासाठी जाती-जातीत दुहीचे विष कालवण्याचं काम सुरू आहे, मात्र त्यामध्ये सर्वसामान्यांचा बळी जातोय, त्यामुळे राजकारण थांबवा आणि जातीय सलोखा राखा असं आवाहन भाजपचे खासदार नारायण राणे यांनी केलं आहे. राज्यातील सर्व जबाबदार नेत्यांनी एकत्र यावं आणि शांतता राखण्याचा प्रयत्न करावा असंही नारायण राणे म्हणाले.

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे खासदार नारायण राणे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये राज्यातील जाती-जातींमध्ये दुही निर्माण होत असून शांतता राखण्यासाठी सर्व नेत्यानी एकत्रित प्रयत्न करावे असं आवाहन केलं आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवकल्याणकारी महाराष्ट्रामध्ये सध्या जाती-जातींमध्ये द्वेषाचे विष कालवून जातीय सलोखा धोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विविध विचारसरणीचे आणि त्यातही नव्याने पुढे आलेले काही नेते किरकोळ राजकीय फायदा नजरेसमोर ठेऊन दुहीचे आणि द्वेषाचे विष कालविण्याचे पाप करीत आहेत. सर्वसामान्यांच्या हितासाठी जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण करीत असल्याची बतावणी ही मंडळी करतात. संघर्षामध्ये शेवटी सर्वसामान्यांचे बळी जातात व नुकसान होते हे मात्र ते विसरतात.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक काळापासून जातीय सलोख्याचे वातावरण आहे आणि गावा-गावांमध्ये लोक गुण्यागोविंद्याने नांदतात. या वातावरणाला नख लावण्याचे प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत. सर्व जबाबबदार राजकीय नेत्यांनी एकत्र येऊन महाराष्ट्रातील जातीय सलोखा कायम रहावा यासाठी प्रयत्न करावेत असे मला वाटते. राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून संघर्षाची स्थिती निर्माण झाल्याचं दिसून येतंय.

तसेच काही राजकीय नेत्यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील धार्मिक आणि जातीय सलोखा बिघडत असल्याचं चित्र आहे. त्याच पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे खासदार नारायण राणे यांनी केलेले आवाहन महत्त्वाचं आहे.

# ‘जलजीवन मिशन’च्या कामांना गती द्यावी

## नांदेड जिल्ह्यात सुरु असणाऱ्या कामांच्या सद्यस्थितीचा अहवाल सादर करावा -उपमुख्यमंत्री अजित पवार



● मुंबई, दिगंबर जाधव :

नांदेड जिल्ह्यातील भोकर, अर्धापूर, मुदखेड तालुक्यासह जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत सुरु असणाऱ्या पाणीपुरवठा योजनांची कामे कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी या कामांना गती द्यावी. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत नांदेड जिल्ह्यात सुरु असणाऱ्या पाणीपुरवठा योजनांच्या कामांचा सद्यस्थितीचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आज नांदेड जिल्ह्यातील भोकर येथील जलजीवन मिशनच्या व वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला खासदार अशोक चव्हाण (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सचिव अभिषेक कृष्णा, दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, उपस्थित होते.

पान २ वर

# चिपळूण महाडच्या धर्तीवर जगबुडी नदीचा गाळ काढून खेडकरांची पुरातून सुटका करा मनसे नेते वैभव खेडेकर

● महाड , दिगंबर जाधव :



रत्नागिरी जिल्ह्यातील खेड शहराला सातत्याने पुराचा फटका बसत आहे सन २००५ सन २०१६ व सन २०२१ व त्यानंतर आता २०२४ या पावसाळ्यात आलेला महापूर बघता खेड शहरातील व्यापारी पेठेत त पुराचे पाणी आल्याने व्यापाऱ्यांशीत नागरिकांचे दरवर्षी नुकसान होते हे नुकसान टाळण्यासाठी राज्य शासनाने चिपळूण व महाडच्या धर्तीवर खेड शहराजवळ वाहणाऱ्या जगबुडी नदीतील गाळ काढून खेडकरांची पुरातून कायमस्वरूपी सुटका करावी अशी मागणी खेडचे माजी नगराध्यक्ष व कोकणचे मनसेचे नेते वैभव खेडेकर यांनी शासनाकडे केली आहे

खेड शहराजवळ राहणाऱ्या जगगुडी नदीतील गाळ काढण्याबाबत वारंवार शासनाकडे ओरड करून व पाठपुरावा करून या नदीचा गाळ काढावा अशी मागणी खेळ मधल्या व्यापाऱ्यांची आहे याबाबत स्थानिक आमदारांनी प्रयत्न करून त्यासाठी दोन कोटी रुपये आणले पण पण त्यासाठी ही अपुरी मदत असल्याने व नदीत साठलेला गाळ देखील मोठ्या प्रमाणात आहे त्यासाठी स्वयंसेवी संस्था यांनी या कामी पुढाकार घ्यावा अशी मागणी खेडचे माजी नगराध्यक्ष व मनसे नेते वैभव खेडेकर यांनी केली आहे.

पान २ वर





ठाणे - ठाणे पूर्व येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त भव्य दिव्य दिंडी काढण्यात आली होती यामध्ये शाळेतील मुले विठ्ठल रुक्मीणी,संत,वारकरी आदींची वेशभूषा करून पारंपरिक वेशात मुलांनी लेझीम द्वारे रिंगण केले.

## संपादकीय

# नियामक नियमन

इतरांनी कसे वागावे यावर उच्चपदस्थांनी प्रवचने झोडण्यास अल्पकर्तृत्व पुरते. त्याचे दिवसागणिक अनेक नमुने आसपास पाहावयास मिळतील. आव्हान असते स्वत:च्या क्षेत्रातील कर्तव्यच्युतीची दखल घेण्याचे आणि उच्चपदस्थांस प्रिय; पण अयोग्य कृती दाखवून देण्याचे. हे आव्हान सर्वोच्च न्यायालय अलीकडे पेलताना दिसते ही मोठी दिलासा देणारी बाब. गेल्या आठवड्याच्या अखेरीस सर्वोच्च न्यायालयाच्या दोन स्वतंत्र पीठांच्या कृतीतून हा दिलासा मिळतो. व्यवस्थेविषयी बरे काही बोलावे, सांगावे असे अनुभव अधिकाधिक दुर्मीळ होत असताना सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतींची दखल घेणे आणि तिचा प्रसार करणे आवश्यक ठरते.

यातील पहिली घटना आहे ती न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भुयान यांनी पटणा उच्च न्यायालयास खडसावले त्याची. या न्यायालयाने एका खून प्रकरणातील आरोपीस जामीन तर दिला; पण त्याच्या जामिनावरील मुक्तता सहा महिन्यांनी होईल अशी अट घातली. खरे तर यातील विरोधाभास लक्षात येण्यास न्यायपंडित असण्याचीही गरज नाही. तरीही आपल्या निर्णयातील खोट या न्यायाधीश महोदयांस लक्षात आली नाही. परिणामी सर्वोच्च न्यायालयाकडून बोलणी खाऊन घेण्याची वेळ उच्च न्यायाधीशांनी स्वत:वर आणली. ''हा काय प्रकार आहे? काही न्यायाधीशांकडून सहा महिने वा वर्षभर जामीन नाकारण्याचे प्रकार घडत असताना त्यात आता हा नवा नमुना'' असे म्हणत न्या. ओक यांनी या ''आभासी जामीन'' प्रकाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. 'आरोपी जामिनास पात्र आहे; पण तो त्यास सहा महिन्यांनी मिळेल' हे असे सांगणे कोणत्या कायद्यात बसते असा न्या. ओक यांच्या म्हणण्याचा अर्थ. पाटणा उच्च न्यायालयाच्या या आदेशाची संभावना न्या. ओक 'अगदी विचित्र' (एक्स्ट्रीमली स्ट्रेंज) या विशेषणाने करतात. सर्वोच्च न्यायालयालाच आपल्या नियंत्रणाखालील उच्च न्यायालयाचे वर्तन 'अगदी विचित्र' वाटत असेल तर सामान्यांच्या न्यायाधीशांबाबतच्या भावना काय असतील हे समजून घेणे अवघड नाही. अलीकडे काही उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांवर कडकडीत आसूड ओढण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर वारंवार येताना दिसते. गुजरात, पाटणा ही यातील काही उदाहरणे. आपणच ज्याचे नियंत्रण करतो त्या काही उच्च न्यायालयातील काही न्यायाधीशांची बौद्धिक कमअस्सलता सर्वोच्च न्यायालयास खरोखरच टोचू लागली असेल तर त्यातून परिस्थितीत काही सुधारणा होण्याची शक्यता निर्माण तरी होते. एरवी आपले कसे उत्तम सुरू आहे याची टिमकी स्वत:च वाजवणाऱ्यांची कमतरता आपल्याकडे नाही. सर्वोच्च न्यायालयाची दुसरी कौतुकास पात्र कृती ही अलीकडे सत्ताधीशांस प्राणप्रिय अशा 'ईडी' या यंत्रणेविषयी आहे. ही यंत्रणा म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या राजकीय लढाईतील जणू ब्रह्मास्त्रच. पूर्वी ही जबाबदारी 'सीबीआय' या यंत्रणेवर असे. पण या यंत्रणेस रोखण्याचा अधिकार राज्यांस आहे हे लक्षात आल्यावर 'ईडी'त प्राण फुंकले गेले. तोवर विरोधी बाकांवर असताना 'सीबीआय'च्या दुरुपयोगाविरोधात कंठशोष करणारे सत्तेवर आले की 'आधीचे बरे' असे म्हणण्याची वेळ कशी आणतात, हे दिसून आले होते. अलीकडे सीबीआयच्या जोडीने आपल्यासमोर नतमस्तक होण्यास विरोध करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याच्या कामी 'ईडी'ही जुंपली जाते असा आरोप विरोधक वरचेवर करतात. त्यात तथ्य नाही हे मानणे अवघड. या आरोपांची दखल घेण्याची सजगता सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा दाखवली आणि 'ईडी'चे वस्त्रहरण केले. कानात वारे गेल्यासारखे वागणाऱ्या या यंत्रणेस वेसण घालण्याची गरज होतीच. सर्वोच्च न्यायालयाचे ताजे भाष्य काही प्रमाणात का असेना ती पूर्ण करते. मुद्दा होता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनाचा. त्यांना जामीन देण्यास अर्थातच 'ईडी'चा विरोध आहे आणि त्यांच्यावर झालेली कारवाई ही पूर्णपणे नियमाधारित आणि न्याय्य आहे असे या यंत्रणेचे म्हणणे आहे.



### आजची चित्रोळी

संगोपन लेकरांचे व्हावें निवांत स्थानीं
स्तनपानीं अडथळाआणूं नयेच कोणी
वर्दळीस टाळूनियां ती एकांतात आली
पिऊन लेकरेंहि खरोखरींच तृप्त झाली

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### अपघातातील जखमी वारकऱ्यांवर शासन उपचार...

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, डोंबिवली येथील घेसरगांव परिसरातील वारकरी भक्त MH-०२-FG-९९६६ या क्रमांकाच्या खासगी बसने पंढरपूरच्या दिशेने जात असतांना १५ जुलै २०२४ रोजी मध्येरात्रीच्यावेळी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर कळंबोली पासून काही अंतरावर या खासगी बस आणि बसपुढे चालणाऱ्या ट्रॅक्टरमध्ये भीषण अपघात झाल्याने बस मधील एकूण ५४ वारकऱ्यांपैकी ०३ वारकरी व ट्रॅक्टरमधील ०२ व्यक्ती अशा एकूण ०५ व्यक्तींचा दुदैवी मृत्यू झाला असून, ४६ जखमी वारकऱ्यांवर कळंबोली येथील महात्मा गांधी मीशन रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यापैकी ७ वारकरी गंभीर जखमी असून त्यांच्यावर अती दक्षता विभागात उपचार सुरु आहेत. अपघातातील जखमींच्या वैद्यकीय उपचारावरील सर्व खर्च शासन करणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुंख्यमंत्र्यांनी झालेल्या अपघाताची संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले.

### भरती ३०० जागांसाठी अन् जमले हजारो तरुण

असाच काहीसा प्रकार आज मुंबईतील एअर इंडिया एक्स्प्रेस कंपनीत पाहायला मिळाला. या कंपनीकडून एकूण २७०० जागांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. या भरती प्रक्रियेच्या पहिल्याच टप्प्यात ३०० जागांसाठी तब्बल ३००० तरुण गोळा झाल्यामुळे येथे चांगलाच गोंधळ उडाला.

एअर इंडिया एक्स्प्रेस कंपनीकडून सध्या वेगवेगळ्या पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून एकूण २७०० जागा भरल्या जाणार आहेत. टप्प्या-टप्प्याने ही भरती राबवली जाणार आहे. याच भरतीच्या पहिल्या टप्प्याचे आज आयोजन करण्यात आले होते. या पहिल्या टप्प्यात एकूण ३०० जागांसाठी परीक्षा घेतली जाणार होती. भरती फक्त 300 जागांसाठी होती. पण त्यासाठी तब्बल ३००० मुलं जमा झाली होती. अपेक्षेपेक्षा जास्त मुलं आल्यामुळे येथे काही काळासाठी गोंधळ निर्माण झाला होता.

एअर इंडियामध्ये कामगार भरती होत असल्याने सकाळी साडेआठ वाजता या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर परीक्षार्थींची गर्दी झाली होती. त्यामुळे येथे काहीसा गोंधळ निर्माण झाला होता. मात्र आता परिस्थिती नियंत्रणात आहे. ३००० हजार मुले एकत्र जमले होते. त्यामुळे थोडासा गोंधळ होता. नंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या त्या ठिकाणी गर्दी नाही. मुंबई एअरपोर्ट गेट क्रमांक ५ बाहेर हा गोंधळ झाला होता.

दरम्यान, सध्या या ठिकाणची परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पण फक्त ३०० जागांसाठी तब्बल ३००० मुलं जमा झाल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तरुणांच्या गर्दीचा व्हिडीओ सध्या सगळीकडे चर्चेचा विषय ठरतोय.

### 'जलजीवन मिशन'च्या कामांना गती द्यावी

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत १२३४ कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तर २८ पाणी पुरवठा योजनांची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्फत राबविण्यात येत आहेत. यामध्ये भोकर विधानसभा मतदारसंघातील भोकर, अर्धापूर व मुदखेड तालुक्यात १२२ जिल्हा परिषदेच्या दोन योजनांची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्फत सुरु आहेत. ही सुरु असणारी कामे विहित कालमर्यादेत पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी या कामांना गती द्यावी. त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यात सुरु असणाऱ्या कामांच्या सद्यस्थितीचा अहवाल तातडीने सादर करावेत.

### चिपळूण महाडच्या धर्तीवर जगबुडी नदीचा...

रायगड जिल्ह्यातील महाड व रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण या ठिकाणी देखील सातत्याने पावसाळयात पूर येत होता त्या ठिकाणी शासनाने त्या नदीतल्या गाळ काढण्याबाबत ज्याप्रमाणे निधीची तरतूद केली त्याचप्रमाणे खेड मधून वाहणाऱ्या जगबुडी नदी मध्ये साठलेला गाळ काढण्याबाबत शासनाने निधीची तरतूद करावी अशी मागणी देखील त्यांनी शासनाकडे केली आहे जेणेकरून खेडमधील व्यापारी व नागरिकांना दरवर्षी पुराच्या पाण्याने होणाऱ्या नुकसानापासून बचाव करता येईल याबाबत खेड शहरातील सर्वपक्षीय समिती स्थापन करण्याबाबत ते पुढाकार घेणार असल्याचे सांगून याबाबत शासनावर दबाव टाकून जगबुडी नदीतील गाळ काढण्याबाबत शासनाकडे निधीची मागणी करणार असल्याचे मनसेचे नेते वैभव खेडेकर यांनी सांगितले

# अंबाजोगाई नगरच्या वतीने 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' या योजनेचे अर्ज घेण्यास सुरूवात







अंबाजोगाई (प्रतिनिधी)- अंबाजोगाई नगर परिषदेच्या वतीने दि.१६ जुलै पासुन मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचे अर्ज स्विकारण्यास सुरूवात केली आहे. अंबाजोगाई शहर व परिसरातील महिला दररोज शहराच्या ठिकाणी येवून अर्ज भरण्यासाठी दिवसेंदिवस रांगेत थांबत होते. इतर ऑनलाईन दुकांनांवर गर्दीचे प्रमाण वाढले होते. त्यातच अंबाजोगाई नगर पालिका प्रशासनाच्या लक्षात येताच अंबाजोगाई नगर परिषदेने मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे अर्ज स्विकारण्यास सुरूवात केली आहे.

गेल्या १५ दिवसाखाली मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, मुख्यमंत्री लाडकी बहिण या योजनेसाठी प्रत्येक महिलांना महिन्याला १५०० रूपये मिळतील त्यामुळे हे सर्व कागदपत्रे गोळा करण्यासाठी महिलांनी गर्दी केलेली सध्या दिसून येत आहे. त्यातच अंबाजोगाई नगर परिषदेच्या वतीने सहकार्य ही लाभत आहे.

# ठाण्यातील नौपाडा परिसरातील हाईट बॅरियरला ट्रकची धडक, दुचाकीचालक जखमी..

● ठाणे, विशाल पाटील :



ठाणे - ठाण्यातील नौपाडा लाल बहादूर शास्त्री रोड आराधना टॉकिज जवळील लोखंडी हाईट बॅरियरला ट्रकने धडक दिल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. या धडकेत दुचाकी चालक जखमी झाला असून जवळच्याच हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. ही माहिती मिळताच घटनास्थळी शहर वाहतुक पोलिस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अतिक्रम विभागाचे कर्मचारी दाखल झाले व रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. ठाण्यात साधारण एका वर्षापुर्वी वाहतुकित बदल करण्यात आले तसेच अनेक रस्ते , दुभाजक बंद करण्यात आले. यावेळी या नौपाडा परिसरातील आराधना टॉकीज जवळ लोखंडी हाईट बॅरियर टाकण्यात आले असल्याची माहिती स्थानिक नागरीकांनी दिली. मात्र यावेळी तेथील स्थानिक नागरीकांनी या हाईट बॅरियरला विरोध केला होता. नौपाडा परिसरातील रस्ता रहदारिचा रस्ता असून सातत्याने वाहतुकिची वर्दळ सुरु असते तसेच जवळच शाळा असून लहान मुल , नागरीक या रस्त्यावरुन जात असतात. हा लोखंडी बॅरियर पडून जर काही दुर्घटना घडली असती तर याला कोण जबाबदार राहिल ? असा प्रश्न देखील तेथील नागरिकांनी उपस्थित केला. या हाईट बॅरियरचा काहीही उपयोग नसून तातडीने हा हाईट बॅरियर हटवण्यात यावा अशी मागणी तेथील स्थानिक नागरीकांनी केली आहे नाहीतर येणाऱ्या काळात तीव्र आंदोलन करु असा इशारा देखील नागरीकांनी दिला आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार हा हाईट बॅरियर हटवण्यात येईल का ? असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे.

# कर्करुग्णांना अन्नदान करणारा अन्नमित्र : संजय सोमनाथ शेट्ये



परळच्या टाटा हॉस्पिटलचे नांव घेतले की अंगावर काटा उभा राहतो. कारणच तसे आहे. या टाटा हॉस्पिटलची ख्याती कर्करुग्णांवर करण्यात येणाऱ्या उपचारांमुळे सर्वदूर पसरली आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातून कर्करुग्ण मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी उपचार करवून घेण्यासाठी येत असतात. बरं रुग्ण एकटाच येत नाही तर त्याचा परिवार सुद्धा इथे येतो. या कर्करुग्णांवर टाटाचे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका करीत असतात. पण त्यांची, त्यांच्या परिवाराची क्षुधा शांती कोण करणार, त्यांना पोटात टाकण्यासाठी दोन प्रेमाचे घास कोण देणार ? हा प्रश्न आ वासून उभा राहिला. पण तो चुटकीसरशी सोडवला एका अन्नमित्राने. या अन्नमित्राचे नांव आहे संजय सोमनाथ शेट्ये. गेल्या चार वर्षांपासून आधी दर रविवारी टाटा हॉस्पिटलच्या बाहेर कर्करुग्णांना आणि परिवारजनांना भोजन वाढण्याचे काम अव्याहतपणे संजय सोमनाथ शेट्ये यांनी सुरु ठेवले. अन्नमित्र संजय शेट्ये यांनी अन्नदानाचे पवित्र कार्य सुरु ठेवताच त्यांच्या समवेत सेवा करण्यासाठी सेवाभावी लोक पुढे येऊ लागले. ८ डिसेंबर २०२० रोजी संजय सोमनाथ शेट्ये यांना मेंदूच्या विकाराचा जोरदार झटका बसला. त्यांना लीलावती इस्पितळात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर गिरीश सोनी यांना विचारले की संजय शेट्ये कधी बरे होणार ? तेंव्हा ते म्हणाले की पांडुरंगाच्या चरणी लीन होईपर्यंत औषधोपचार सुरु ठेवावे लागतील. संजय शेट्ये यांची रुग्णसेवा फळाला आली. ते बरे झाले. त्यांनी ठरविले की आपले उर्वरित आयुष्य हे समाजासाठी समर्पित करीन. त्यांनी सौरभ मित्र मंडळाच्या माध्यमातून अहोरात्र रुग्णांना अन्न पुरविण्याचे काम सुरु ठेवले आहे. सौरभ मित्र मंडळाचे तरुण तडफदार सचिव मंगेश वरवडेकर आणि प्रफुल्ल गावडे हे त्यांना सहकार्य करीत आहेत. सुरुवातीला १६० अन्न पाकिटांनी प्रारंभ करणाऱ्या संजय शेट्ये यांनी आता मजल दर मजल करीत १८०, २००, २२५ आणि आता २५० अन्न पाकिटांवर ही संख्या पोहोचली आहे. सहकार्याचे हातही वाढू लागले आहेत. कोरोना महामारीने साऱ्या विश्वाला विळखा घातला होता तेंव्हा संजय सोमनाथ शेट्ये यांचे अन्नछत्र धूमधडाक्यात सुरु होते. त्यामुळे त्यांना जनतेने अन्नमित्र संजय सोमनाथ शेट्ये अशी ओळख मिळवून दिली. त्यांनी ग्रँट रोड भागातील वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांनाही कोण काय म्हणेल याची पर्वा न करता कोरोना काळात अन्न पुरविण्याचे काम केले. कोरोना नंतर सुध्दा या महिलांच्या समस्या लक्षात घेऊन शीधा वाटप केले. जोवर माझ्या जीवात जीव आहे, श्वास सुरु आहे तोवर मी समाजाची, रुग्णांना अन्न पुरविण्याची सेवा सुरु ठेवीन असा निर्धार अन्नमित्र संजय सोमनाथ शेट्ये यांनी बोलून दाखविला आहे. अशा या अन्नमित्राला उदंड आयुष्य आणि ठणठणीत आरोग्य प्राप्त होवो या मनःपूर्वक शुभेच्छा ! याठिकाणी एक आठवण जाणीवपूर्वक सांगतो की माझ्या मातोश्री ज्येष्ठ समाजसेविका , भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार सन्मानित मनोरमा वसंत त्रिवेदी यांना ब्रेस्ट कॅन्सर (स्तनांचा कर्करोग ) झाला होता आणि आमचा परिवार चिंताग्रस्त झाला होता . त्यावेळी तत्कालीन आरोग्य मंत्री सुरेश शेट्टी यांनी केलेल्या शिफारशीनुसार परळच्या राजे एडवर्ड स्मृती बाह्य रुग्णालय (के. ई. एम हॉस्पिटल) मध्ये तत्कालीन अधिष्ठाता डॉ संजय ओक यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शिल्पा राव यांनी आमच्या मातोश्रींवर यशस्वी उपचार केले आणि मातोश्री कर्करोग मुक्त झाल्या. त्यावेळी आमचा परिवार परळच्या या भागातील उपहारगृहात आपली क्षुधा शांती करीत होता. कर्करोग मुक्त झालेल्या आमच्या मातोश्री त्यांचे लहान बंधू विनोद चंदुलाल त्रिवेदी यांच्या आकस्मिक निधनाचा धक्का सहन करु शकल्या नाहीत आणि २० जानेवारी २०१६ रोजी त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली. परळ ही वैद्यकीय उपचार नगरी असून या परिसरात रुग्णांचे लाखो नातेवाईक आपापल्या पोटाची खळगी भरण्यासाठी धावपळ करीत असतात त्यांच्या सेवेसाठी अन्नमित्र संजय सोमनाथ शेट्ये आणि असंख्य सेवक धावून जातात मग त्यात परेश समजिसकर व त्यांचा परिवार, दीपक कैतके आणि त्यांचा परिवार अहमहमिकेने रुग्णसेवक म्हणून झटत असतो. या तमाम सेवकांना मानाचा मुजरा.

**-योगेश वसंत त्रिवेदी, (लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत).**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात

### ५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत

रत्नागिरी (जिमाका) : ग्रामीण डाक सेवक पदांची भरती प्रक्रिया 15 जुलैपासून ऑनलाईन सुरु झाली असून, उमेदवारांनी 5 ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन डाकघर अधिक्षकांनी केले आहे. टपाल विभागातील गाम्रीण डाक सेवकांची एकूण 216 पदे विविध प्रवर्गातून भरण्यात येणार आहेत. त्यासाठी http://indiapostgdsonline.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. अर्ज भरण्याची अंतिम तारीख 5 ऑगस्ट आहे.

### दिव्यांग व्यक्तींना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञानाकरिता अर्थसहाय्य देणे या योजनेचा लाभ घ्यावा

रत्नागिरी (जिमाका) : दिव्यांग व्यक्तींना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञानाकरिता अर्थसहाय्य देणे या योजनेचा लाभ दिव्यांग लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे. अंधव्यक्तींसाठी, कर्णबधीर व्यक्तींसाठी, अस्थिव्यंग व्यक्तींसाठी व मतिमंद व्यक्तींसाठी सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभूत साधने, दिव्यांग व्यक्तीना स्वयंरोजगबासाठी अर्थसहाय्य देणे, दिव्यांग व्यक्तींसाठी घरकुल योजना, दिव्यांग- दिव्यांग व्यक्तींना विवाहसाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. तसेच दिव्यांग विद्यार्थी व दिव्यांग खेळाडू यांना अर्थसहाय्य देणे यासारखे लाभ देण्यात येतात. तरी या योजनांचा दिव्यांग लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा.

### डाक विभागामार्फत एका छताखाली विविध योजनांचा लाभ

रत्नागिरी (जिमाका) : डाक विभागामार्फत सर्व नागरिकांना एका छताखाली विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी वित्तीय समावेशन विविध मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. १६ जुलै रोजी आंबेड बु. आणि खेड मुख्य डाकघर, १९ जुलै रोजी मंडणगड, २३ जुलै रोजी शृंगारतळी, २४ जुलै रोजी इब्राहीम पट्टण, २५ जुलै रोजी तळवडे, रामपूर, रत्नागिरी हेड पोस्ट ऑफीस आणि चिपळूण पोस्ट ऑफीस या ठिकाणी मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या मेळाव्यास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून पोस्ट ऑफिसच्या सेवांचा व शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन अधीक्षक डाकघर एन. टी. कुरळपकर यांनी केले आहे. या मेळाव्यामध्ये आधारच्या सर्व सुविधा, डाक विमा, ग्रामीण डाक विमा, इंडिया पोस्ट पेमेंट बँकच्या सुविधा, माय स्टॅप, प्रधानमंत्री किसान योजना खाती, माझी लाडकी बहीण योजनेसाठीचे आवश्यक आधार संलग्न खाते उघडणे, पोस्ट ऑफिसच्या विविध बचत योजना, महिला सन्मान योजना, सुकन्या समृद्धी खाते, मुदत ठेव, आवर्ती ठेव, किसान विकास पत्र अशा विविध योजनांच्या सुविधा तसेच केंद्र व राज्य व स्थानिक संस्थांच्या लोक कल्याणकारी योजनांचा लाभ मेळाव्याच्या माध्यमातून नागरिकांना मिळणार आहे.

# रूट कॅनल प्रक्रिया करताना तीन वर्षाच्या चिमुरड्याच्या फुफ्फुसात अडकले डेंटल फाईल

## तातडीने रुग्णालयात आणल्याने डॉक्टरांनी उपचार करत वाचविला जीव



कल्याण : मुंब्रा येथे राहणाऱ्या मोहम्मद हैदर या तीन वर्षीय चिमुरड्याच्या हिरड्यांना सूज आणि संसर्ग झाल्याने रुग्णालयात रूट कॅनलकरिता नेण्यात आले होते. या प्रक्रियेदरम्यान हलगर्जीपणामुळे मुलाच्या उजव्या फुफ्फुसात डेंटल फाइल( सुईसारखे टोकदार साहित्य) अडकले. याप्रसंगी त्याला त्वरीत मुंब्र्यातील जीएचसी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रसंगावधान राखत डॉ. जसप्रीत सिंग खांडपुर आणि त्यांच्या टीमने वेळीच उपचार केल्याने रुग्णाचा जीव वाचविण्याच आला.

डॉ. जसप्रीत सिंग खांडपुर सांगतात की, आपत्कालीन कक्षात दाखल झाल्यावर आल्यावर, मुलाची प्रकृती स्थिर होती आणि त्याला कोणतीही गंभीर लक्षणे दिसत नव्हती. एक्सरे काढल्यानंतर मुलाच्या उजव्या फुफ्फुसात एक पातळ सुई अडकल्याचे दिसून आले. मुलाला शांत केल्यानंतर, उजव्या बाजूच्या नाकापासून तोंडापर्यंत आणि तिथुन थेट फुफ्फुसात ब्रॉन्कोस्कोप घालण्यात आला. यावेळी उजव्या बाजूच्या मधल्या लोबमध्ये श्वासनलिकेच्या दिशेने तीक्ष्ण डेंटल फाइल अडकल्याचे दिसून आले. हे आकाराने लहान असूनही, एक लहान ब्रॉन्कोस्कोप आणि फोरसेप वापरून काढण्याचा प्रयत्न केला आणि डेंटल फाईल यशस्वीरित्या बाहेर काढण्यात डॉक्टरांना यश आले. रुग्ण आता पूर्णत: बरा झाला असून त्याला दुसऱ्याच दिवशी घरी सोडण्यात आले. डॉ. खांडपूर पुढे सांगतात की, प्रक्रियेस उशीर केला असता गंभीर गुंतागुंतीची शक्यत होती. या डेंटल फाईलने श्वासनलिका किंवा फुफ्फुसाला छिद्र पाडले असते, ज्यामुळे न्यूमोनिया, लंग कोलॅप्स किंवा श्वासनलिकेस छिद्र पडणे यासारख्या तीव्र संक्रमणाची शक्यता होती. ब्रॉन्कोस्कोपसह केवळ उपशामक औषध आणि ऑक्सिजन सपोर्ट वापरून, इंट्यूबेशन आणि व्हेंटिलेटर न वापरता डेंटल फाईल यशस्वीरित्या काढण्यात आली. ही पद्धत गुंतागुंतीची आणि आव्हानात्मक होती. पालकांनी त्यांच्या मुलांची दंत प्रक्रिया करताना विशेष सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. अत्याधुनिक यंत्रांचा समावेश असलेल्या रुग्णालयात ही प्रक्रिया करावी. याव्यतिरिक्त, पालकांनी लहान मुलांना खेळणी,सुई, नाणी, पिन, बाटलीचे झाकण, काजू, हिरवे वाटाणे आणि शेंगदाणे यांसारख्या वस्तू देणे टाळले पाहिजे, कारण या लहान वस्तू त्यांच्या फुफ्फुसात किंवा पोटात अडकण्याची दाट शक्यता असते.

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील सीसीटिव्ही कॅमेरा बंदच



पनवेल : सरकारने २२ वर्षांपूर्वी यशवंतराव चव्हाण मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग बांधला परंतू अजूनही या महामार्गातील दोष सरकार दूर करु शकली नाही. सर्वाधिक पथकर याच महामार्गावरील वाहनचालकांकडून वसूल केला जात असला तरी वाहनचालक व प्रवाशांची सूरक्षा वा-यावर आहे. सोमवारी मध्यरात्री वारक-यांची बस व ट्रक्टरच्या भिषण अपघातामध्ये महामार्गावरील सीसीटिव्ही कॅमेरांमध्ये या अपघाताची दृष्ये कैद झाली का याविषयी पोलीस तपास करु लागले, मात्र हे सीसीटिव्ही कॅमेरा अद्यार कार्यान्वित न झाल्याने सरकारच्या कामांच्या प्राधान्यक्रमांविषयी साशंकता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडेच अनेक वर्षे नगरविकास व एमएसआरडीसी या विभागाचा पदभार असला तरी मुख्यमंत्री ही परिस्थिती बदलू शकली नाहीत. ९४.५ किलोमीटर अंतरावर तातडीने मुंबईहून पुण्याला जाता यावे यासाठी हा महामार्ग बांधण्यात आला. मागील २२ वर्षापासून शेकडो प्रवाशांचे या महामार्गात जिव गेले. प्रत्येक अपघातावेळी सरकारचे मंत्री द्रुतगती महामार्गालगत तातडीने जखमींना उपचार मिळावेत म्हणून ट्रामा सेंटर, वाहनांच्या गती नियंत्रणासाठी सीसीटिव्ही कॅमेरे, हॅलिपॅड याविषयी घोषणा करते.

## कॉम्रेड औदुंबर कोकरे यांचा वाढदिवस शासकीय मुलांच्या बालगृहात साजरा



कल्याण : महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे कॉम्रेड औदुंबर कोकरे संयुक्त सचिव व कल्याण पतसंस्थेचे वृंदावन संचालक यांचा वाढदिवस कल्याण सर्कलच्या वतीने महिला व बाल विकास विभाग द्वारे चालविण्यात येणारे शासकीय मुलांचे बालगृह (कनिष्ठ) उल्हासनगर येथे आयोजित करण्यात आला होता. शासनातर्फे विविध ठिकाणी बेवारस, हरवलेले सापडलेली अनाथ मुले या संस्थेत ठेवली जातात. या संस्थेच्या वतीने त्यांचे पालन पोषण करण्यात येत असते. या बालसुधारगृहात कॉम्रेड औदुंबर कोकरे यांचा वाढदिवस लहान मुलांच्या समवेत केक कापून पुष्पगुच्छ देत,अन्नदान करून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास कॉम्रेड कृष्णा भोयर, अविनाश शेवाळे, कीर्ती कुमार मुकणे, अशोक बामगुडे, राजेश अहिरे, महादेव गायकवाड, गुणवंत राठोड, राजेश वाडकर, श्रीनिवास नका, जितेंद्र लहाने, पांडुरंग सूर्यवंशी, दीपक गुप्ता, सागर ठाकूर, संतोष भोसले, नितीन काळे, निलेश झुंजारराव, निलेश वारके, विनोद गिलबिले, महेश कळसकर, प्रकाश पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शिकाऊ उमेदवारांना निवड पत्र वाटप




जि.प.ठाणे, - जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत दि. 15 जुलै रोजी शिकाऊ उमेदवारी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यींना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सदिच्छा दिल्या. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते याच्या हस्ते उमेदवारांना निवड पत्र देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

कुशल काम असो, रोजगार असो किंवा उद्योजकता कामात उत्तम कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्य असते. तरुणांनी आत्मसात केलेले कौशल्य अधोरेखित करण्यासाठी आणि काळानुसार ते अधिक कुशल होण्यासाठी प्रयत्नशील असणे ही काळाची गरज आहे. जागतिक युवा कौशल्य दिन 2024 ची थीम शांतता आणि विकासासाठी युवकांची कौशल्य (USE SKILL FOR PIECE AND DEVELOPMENT) अशी असून यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा असे मार्गदर्शन यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी केले.

त्यावेळी ठाणे आयटीआय चे प्राचार्य स्मिता माने ,सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार विजय टिकोले, गंगाराम कर्पे, तसेच गटनिदेशक तृषांत मोटगरे, कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार राजेश सोनवणे, निदेशक शर्वरी दुर्गुळे तसेच शिकाऊ उमेदवारी करिता निवड झालेले प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रशिक्षण घेणारे युवक रोजगार, स्वयंरोजगारासाठी मोलाची भूमिका बजावत असतात. कंपनीसाठी, स्वरोजगरासाठी आवश्यक मनुष्यबळ आयटीआय द्वारे पुरविले जात आहेत. कुशल मनुष्यबळाची गरज आयटीआय प्रशिक्षण पूर्ण करीत आहे, त्यामुळे जागतिक युवा कौशल्य दिनाला आयटीआय करिता प्रचंड महत्त्व आहे असे प्रतिपादन प्राचार्य स्मिता माने यांनी यावेळी केले.

# कल्याण शहरातील तरुणांचे प्रश्न सोडविण्यासह व नवे प्रकल्प आणण्याची युवतीची खासदारांकडे मागणी

## आर्या बासरे या तरुणीने घेतली खासदार सुरेश म्हात्रे यांची भेट



कल्याण : कल्याण शहरातील तरुणांचे प्रश्न सोडविण्यासह व शहरात नवे प्रकल्प आणण्याची मागणी एका युवतीने खासदारांकडे केली आहे. कल्याण पश्चिमेतील आर्या बासरे या तरुणीने भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे. गेल्या दहा वर्षांपासून कल्याण शहराची अपेक्षित प्रगती झालेली नाही तसेच येथील तरुणांचे प्रश्न हे नेहमीच दुर्लक्षित राहिलेले आहेत. शिक्षण आरोग्य पर्यटन या क्षेत्रांमध्ये कुठल्याही प्रकारचा विकास शहरात झालेला नाही. भिवंडी लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार असून तरुणांच्या प्रश्नांना न्याय द्याल व जनहितासाठीचे प्रकल्प या शहरात आणाल अशी अपेक्षा या निवेदनात नमूद केली आहे.

कल्याण शहरात भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचा जन्म झाला होता. तरीही या शहरात एकही मेडिकल कॉलेज नाही. तरी या शहरात शासकीय मेडिकल कॉलेज व्हावे व त्या कॉलेजला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचेच नाव दिले जावे ही तरुणांची मागणी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता एक उत्कृष्ट दर्जाचे शासकीय वाचनालय आणि अभ्यासिका शहरात उभारली गेली पाहिजे. दुर्गाडी किल्ला हे कल्याणकरांचे वैभव तसेच अस्मिता आहे. जेथे शिवाजी महाराजांनी पहिले आरमार उभारले परंतु तेथे असलेले दुर्गा देवीचे मंदिर एवढीच त्याची ओळख राहिलेली आहे. तरी किल्ल्याचा इतिहास हा जनतेपर्यंत पोहोचणे खूप महत्त्वाचे आहे व पर्यटनाचा विचार करता येथे एक तरी महाराजांचे संग्रहालय असावे. तसेच किल्ल्याचा आजूबाजूचा परिसरात अतिशय दुर्गंधी असून किल्ल्याला कोणत्याही प्रकारची सीमारेषा नाही.

शहरातील खेळाडूंचा विचार करता शहरात उत्कृष्ट दर्जाचे शासकीय क्रीडा संकुल नाही तरी इन डोअर व आउट डोअर खेळांसाठी व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय क्रीडा संकुल असावे. येथील तरुणांशी विचार विनिमय करून या काही मागण्या प्रस्तुत केल्या असून या मागण्यांचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा अशी मागणी आर्या बांसरे या युवतीने कल्याण पश्चिमेतील समस्त युवा वर्गाच्या वतीने खासदारांकडे केली आहे.

# कचोरे टेकडीवर दरड कोसळण्याची घटना टेकडीवरील घरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील कचोरे टेकडीवरील भुसंख्लनामुळे मोठा दगड घराच्या भिंतीवर घरगळत येऊन आदळल्याने भिंतीला तडा गेल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. सुदैवाने कोणालाही या घटनेत दुखापत झाली नाही. परंतु या घटनेने कल्याण डोंबिवली परिसरातील टेकडीवरील घरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कचोरे टेकडी परिसरात सुमारे ५०० हून अधिक घरे आहेत. पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे भुसख्लनामुळे टेकडी परिसरात दरड कोसळण्याच्या घटना घडतात. परंतु प्रशासन नोटिसा देऊन मोकळे होते. संदर्भीत परिसरात संभाव्य ठिकाणी संरक्षण जाळ्या बसवून संभाव्य अपघाताची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना होणे अंत्यत गरजेचे असून आता तरी प्रशासनाने संदर्भीत टेकडी परिसरात अनाधिकृत बांधकामाला आळा घातला पाहिजे. टेकडी परिसराचा र्हास थांबिविणे काळाची गरज असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे. कल्याण पूर्वेतील कचोरे टेकडीवरील झाडाच्या मुळाची माती ढासळल्याने तेथील एक दगड त्याबरोबर खाली आला आणि भिंतीला धडक दिल्याने भिंतीला तडा गेला. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. कचोरे, नेतवली, वालधुनी अशा ठिकाणाच्या १४० कुटुंबीयांना नोटीसा यापूर्वी दिल्या आहेत. कचोरे टेकडी परिसरातील २० ते २५ कुटुंबायांचे शाळेत स्थालंतर करीत असून या परिसरातील नोटीस दिलेले कुटुंबीय पाऊस बंद झाल्यानंतर पुन्हा येतात. आता आम्ही येथील फोर्स फुली स्थालंतर करण्याचे नियोजन असल्याची माहिती "जे" प्रभाग सहाय्यक आयुक्त सविता हिले यांनी दिली."

## कल्याण- माळशेज या राष्ट्रीय महामार्गावरील वैशाखरे नदीवरील पुलावर खड्यांची रांगोळी.!



मुरबाड - मुरबाड-कल्याण माळशेज महामार्गावरील वैशाखरे नदीवरील पुल खड्डेमय झाला असुन रात्रंदिवस हजारो वहानांची वर्दळ असलेला पुल एक प्रकारे मृत्यूचा सापळा झाल्याचे निदर्शनास येत आहे मार्च महिन्यात संबंधित पुलावरील खड्डे डांबरीकरण करुन बुजविण्यात आले होते. मात्र पावसाळा सुरू होताच खड्ड्यांचे साम्राज्य सुरू झाले संबंधित जिवघेण्या खड्यांनमुळे वहानचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असुन धोकादायक बाब म्हणजे दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांचा बळी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच याच राष्ट्रीय महामार्गावर असलेले सरळगाव,शिवळे येथील समर्थ हॉटेल जवळ मोठा खड्डा पडलेला आहे.तसेच खाटेघर ,पर्यंत महत्वाच्या ठिकाणी मोठे-मोठे पडला आहे तरी हे खड्डे त्वरित भरून टाकावे अशी मागणी प्रवाशी व वाहनचालकांनी केली आहे.

या महामार्गावरून आमदार,खासदार, तसेच सर्वच राजकीय पक्षांचे नेते मंडळी सातत्याने प्रवास करीत असताना सुद्धा नॅशनल हायवे चे अधिकारी का?दुर्लक्ष करीत आहेत असा यक्षप्रश्न निर्माण होत आहे. संबंधित खड्डे भरण्यासाठी वेळीच उपाययोजना केली नाही तर सावित्री नदीच्या पुलाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतला सर्व विभागांच्या कामकाजाचा आढावा



'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेमध्ये पात्र लाभार्थी महिलांनी अर्ज दाखल करुन योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिक व्यापक प्रचार, प्रसिध्दी करावी व एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही याची काटेकोर काळजी घ्यावी तसेच शासनाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेचा लाभही नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील जास्तीत तरुणांना होईल यासाठी त्याची माहिती व्यापक प्रसिध्दी करण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिले. अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्यासह विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत सर्व विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेताना आयुक्तांनी सर्व विभागांनी पुढील दोन महिन्यातील कामाचे नियोजन करावे आणि त्याचा आराखडा सादर करावा असे निर्देश दिले.

कार्यालयात गतीमान, नियोजनबध्द व पारदर्शक कामकाजासाठी ई-ऑफिस प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने जलद कार्यवाही करावी तसेच 'एक कर्मचारी - एक नस्ती' अशी कार्यप्रणाली राबवून कार्यालयीन प्रणाली सुलभ होईल व नस्तींची संख्या मर्यादित राहील याकडे लक्ष दयावे असे निर्देश दिले.

शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासोबतच शिक्षकांचे प्रशिक्षण घेऊन त्यांचे माहिती व ज्ञान अदययावत करण्यासाठी ठोस पावले उचलावीत असे सांगतानाच अधिकाऱ्यांनी क्षेत्रिय पाहणी दौऱ्यासाठी जाताना त्या क्षेत्रातील शाळेलाही भेट देऊन तेथील कामकाजाची व स्वच्छतेसहीत इतर सुविधांची पाहणी करावी व त्याचा अहवाल सादर करुन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी योगदान दयावे असे निर्देश आयुक्तांनी दिले.

महानगरपालिकेच्या शाळांचे वेगळेपण दर्शनी स्वरुपात दिसावे यादृष्टीने कार्यवाही करण्याचेही त्यांनी निर्देशित केले. स्मार्ट शाळांप्रमाणेच स्मार्ट नागरी आरोग्य केंद्रे असावीत याबाबत आरोग्य विभागाने कार्यवाही करावी असे आयुक्तांनी निर्देश दिले. तसेच आपला दवाखाना कार्यान्वित करणे, पशुवैदयकीय रुग्णालय सुरु करणे, पी जी इन्स्टिटयूट सुरु करणे याबाबतची कार्यवाही जलद करण्याचे निर्देशित करण्यात आले.

विविध नागरी सुविधा कामांसाठी शासनामार्फत व जिल्हा नियोजन समितीमार्फत विविध योजनांतर्गत उपलब्ध होणारा निधी प्राप्त करुन घेऊन त्याचा उपयोग नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सेवासुविधा पुरविण्यासाठी करण्यात यावा असे सूचित करीत आयुक्तांनी नमुंमपास प्राप्त होणारा शासकीय निधी पूर्णपणे वापरला जाईल याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देशित केले. अमृत 2, पंधरावा वित्त आयोग या शासकीय योजनांतर्गत सुरु असलेली कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देत याबाबतच्या सदयस्थितीची माहिती लगेच सादर करावी असे निर्देशित करण्यात आले.

परवाने ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याची प्रक्रीया जलद करण्याचे निर्देशित करीत एकेक करुन सर्व परवाने ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याचे निर्देश त्यांनी दिले. क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देताना त्याची सुयोग्यता पाहणे व गुणवत्ता राखणे याकरिता विविध खेळातील तज्ज्ञांची मार्गदर्शक समिती स्थापन करण्याबाबत जलद कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या मालमत्तांचे डिजिटलायझेशन करण्याचेही निर्देश यावेळी देण्यात आले.

आगामी कालावधीत विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होईल हे लक्षात घेऊन त्या काळातील गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, दिवाळी अशा उत्सवांच्या अनुषंगाने व पूर्तता करावयाच्या आवश्यक नागरी सुविधा कामांच्या अनुषंगाने आगामी काळात करावयाच्या कामांचे नियोजन करावे व त्यासाठी आवश्यक असलेली कार्यालयीन कार्यवाही जलद पूर्ण करावी अशाही सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

# “जर तुला भारतात काम करायचे असेल तर...,” आमिर खानने लाडक्या लेकाला दिला सल्ला




बॉलीवूडचे कलाकार सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांचा चित्रपट, कधी त्यांचा अभिनय, तर कधी त्यांचे वक्तव्य यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. काही दिवसांपासून अभिनेता जुनैद खान ( Junaid Khan ) हा सतत चर्चेत असल्याचे पाहायला मिळत आहे. जेव्हा त्याने त्याच्या वडिलांना म्हणजेच आमिर खान (Aamir Khan) ला चित्रपटसृष्टीत येण्याबद्दल सांगितले होते तेव्हा त्यांनी प्रतिक्रिया दिली होती, सल्ला दिला होता याचा खुलासा जुनैदने एका मुलाखतीदरम्यान केला आहे. काय म्हणाला होता आमिर खान? एका यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत जुनैदने याबद्दल सांगितले आहे. ‘महाराज’फेम अभिनेता जुनैद खान हा बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खानचा मुलगा आहे. जेव्हा जुनैदने आपल्या करिअरची निवड केली आणि वडिलांना सांगितले की, मला अभिनय क्षेत्रात यायचे आहे. त्यावेळी आमिर खानने आपल्या मुलाला जुनैद खानला असा सल्ला दिला होता की, “तुला अभिनय करायचा आहे, तर तो शिकशील; त्यात अवघड काही नाही. मात्र, जर तुला भारतात काम करायचे असेल, तर तू इथल्या परंपरांकडे दुर्लक्ष करू नको. भारताची संस्कृती तुला माहीत असायला हवी. तुझा भारताच्या परंपरा-संस्कृतीशी परिचय असायला हवा.”

जुनैद खान नुकताच ‘महाराज’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. सिद्धार्थ मल्होत्रा यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात जुनैद खान ‘करसन’च्या भूमिकेत दिसला आहे. त्याबरोबरच शालिनी पांडे, शर्वरी वाघ, समीर परांजपे हे कलाकारदेखील अभिनय करताना दिसले होते. जुनैद खानच्या अभिनयाबद्दल बोलायचे, तर महाराज हा त्याचा पहिलाच चित्रपट आहे; पण त्याच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांचा त्याला उत्तम प्रतिसाद लाभत असल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, याआधी एका मुलाखतीत जुनैद खान या चित्रपटाऐवजी दुसऱ्या चित्रपटातून भेटीला येणार होता, याबद्दल त्याने सांगितले होते. त्याने म्हटले होते की, मी ‘महाराज’ चित्रपटातून नाही तर ‘लाल सिंग चड्ढा’ चित्रपटासाठी ऑडिशन दिली होती.

# टीम इंडियाला मोठा धक्का! श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेतून हार्दिक पंड्या बाहेर?

भारतीय क्रिकेट संघ येत्या काही दिवसात श्रीलंका दौऱ्यासाठी रवाना होणार आहेय. या दौऱ्यात श्रीलंका-भारत यांच्यात टी-२० आणि वनडे मालिका खेळली जाणार आहे. या दौऱ्याला २७ जुलैपासून सुरुवात होणार आहे. भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या श्रीलंका दौऱ्यावर जाणार असल्याची मोठी बातमी आहे. तो फक्त टी-२० मालिकेत संघाचे प्रतिनिधित्व करणार असून वनडे मालिकेतून त्याने माघार घेतली आहे. याबाबत त्याने बीसीसीआय कळवल्याचे माहिती आहे. तो वनडे मालिकेत का खेळणार नाही? याबद्दल जाणून घेऊया.

हार्दिक पंड्या टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा एक सदस्य होता आणि संपूर्ण स्पर्धेत त्याने संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. वर्ल्ड चॅम्पियन बनल्यानंतर हार्दिक पंड्यासह सर्व वरिष्ठ खेळाडू विश्रांती घेत आहेत. मात्र, नवीन मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना वनडे मालिकेसाठी वरिष्ठांनी परत यावे, असे वाटत असल्याचे वृत्त आहे. एकीकडे विराट कोहली लंडनमध्ये आहे तर दुसरीकडे वैयक्तिक कारणांमुळे रोहित शर्मा इंग्लंडनंतर अमेरिकेत आहे. यामुळे त्यांच्याबद्दल अद्याप कोणतेही अपडेट आलेली नाही. त्यामुळे या दौऱ्यासाठी भारतीय संघ निवडलेला नाही. तो येत्या काही दिवसात निवडला जाईल.

पंड्याने वनडे मालिकेतून का माघार घेतली?

हार्दिक पंड्याने श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेत सहभागी न होण्यासाठी वैयक्तिक कारण सांगितले आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले ही एक नाजूक बाब आहे. हार्दिकचा फिटनेस हा मोठा मुद्दा आहे, पण भारताचा आयसीसी ट्रॉफी न जिंकण्याचा दुष्काळ संपवण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, वनडे मालिकेत सहभागी न होण्याचे खरे कारण हार्दिक पंड्याच सांगू शकतो. अलीकडेच तो अनंत अंबानीच्या लग्नात जोमाने डान्स करताना दिसला होता. अनन्या पांडे आणि रणवीर सिंगसह त्याने खूप डान्स केला होता.



२७ जुलैपासून टी-२० मालिकेला होणार सुरुवात –

बीसीसीआयने अधिकृत घोषणा करून ही माहिती दिली आहे. नव्या वेळापत्रकानुसार आता २७ जुलैपासून टी-२० मालिका सुरू होणार आहे. यापूर्वी २६ जुलैला म्हणजे एक दिवस आधी टी-२० मालिकेला सुरूवात होणार होती. पण आता २७ जुलैपासून सुरूवात होणार आहे. दुसरा सामना २८ जुलै ऐवजी २९ जुलै आणि तिसरा सामना २९ जुलै ऐवजी ३० जुलैला खेळवला जाईल. टी-२० मालिकेतील सर्व सामने पल्लेकेले येथील स्टेडियमवर खेळवले जातील.

टीम इंडियाचे श्रीलंका दौऱ्याचे सुधारीत वेळापत्रक –

पहिला टी-२० सामना, २७ जुलै रोजी संध्याकाळी ७ वाजता (भारतीय वेळेनुसार), पल्लेकेले स्टेडियम

दुसरा २० सामना, २८ जुलै, संध्याकाळी ७ वाजता, पल्लेकेले स्टेडियम

तिसरा टी-२० सामना, ३० जुलै रोजी संध्याकाळी ७ वाजता, पल्लेकेले स्टेडियम

पहिला एकदिवसीय सामना, २ ऑगस्ट, दुपारी २.३० वाजता, कोलंबो

दुसरा एकदिवसीय सामना, ४ ऑगस्ट, दुपारी २.३० वाजता, कोलंबो

तिसरा एकदिवसीय सामना, ७ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता, कोलंबो

# अभिनेत्री रकुल प्रीत सिंगच्या भावाला ड्रग्ज प्रकरणात अटक




बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंगचा भाऊ अमन प्रीत सिंगला पोलिसांनी अटक केली आहे. अमनसह इतर चार जणांना सोमवारी हैदराबाद पोलिसांनी एका कथित ड्रग्ज प्रकरणात अटक केली, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं. तेलंगणाच्या अंमली पदार्थ विरोधी विभागाने २.६ किलो कोकेन जप्त केले आहे. हे कोकेन हैदराबादला विक्रीसाठी आणले जात होते अशी विभागाला माहिती मिळाली. त्यानंतर अमनसह इतर आरोपींना अटक करण्यात आली.

‘इंडिया टुडे’च्या वृत्तानुसार, पोलिसांच्या पथकाने ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश केला असून ३० संभाव्य ग्राहकांची ओळख पटवली आहे. तर, अटक करण्यात आलेल्यांमध्ये अमन प्रीत सिंग, अनिकेथ रेड्डी, प्रसाद, मधुसूदन आणि निखिल दमन या पाच जणांचा समावेश आहे. हे सर्वजण सध्या पोलीस कोठडीत असून वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना न्यायालयात हजर केले जाईल.

पोलीस अधिकारी काय म्हणाले?

“आम्ही पाच जणांना पोलीस ठाण्यात आणलं आहे. युरिन चाचणीमध्ये ते सर्व पॉझिटिव्ह आढळले आहेत. त्यांना ताब्यात घेण्यात आलं असून लवकरच वैद्यकीय तपासणीसाठी पाठवणार आहोत,” अशी माहिती सायबराबाद पोलिसांच्या राजेंद्र नगर झोनचे डीसीपी श्रीनिवास यांनी दिली.

अमन हा अभिनेता होण्यासाठी सिनेसृष्टीत संघर्ष करत आहे. त्याने आतापर्यंत अनेक म्युझिक व्हिडीओंमध्ये काम केलं आहे. त्याला प्रवासाची खूप आवड आहे, असं त्याच्या सोशल मीडियावर दिसून येतं. अमनच्या अटकेबद्दल रकुल प्रीत किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. दरम्यान, रकुल प्रीत सिंगला देखील २०२२ आणि २०२१ मध्ये अंमली पदार्थांची तस्करी आणि सेवन प्रकरणात ईडीने समन्स बजावले होते. गेल्या वर्षीही या संदर्भात तपास यंत्रणेने तिचा जबाब नोंदवला होता. रकुलशिवाय राणा दग्गुबती, चार्मे कौर, नवदीप, रवी तेजा आणि पुरी जगन्नाथ यांनाही ड्रग्ज प्रकरणात चौकशीसाठी बोलावण्यात आले होते.

# “कर्णधारपद आणि प्रसिद्धी मिळताच विराट बदलला



भारताचा अनुभवी फिरकीपटू अमित मिश्रा नुकत्याच एका पोडकास्टसाठी गेला होता. अमित मिश्रा आणि भारताचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहलीसह बराच काळ भारतीय संघातून क्रिकेट खेळला आहे. या पोडका्टमध्ये अमित मिश्राला हे दोन्ही खेळाडू पूर्वी कसे होते आणि कसे आहेत, याबद्दल विचारले असता त्याने विराचट आणि रोहितवर मोठे वक्तव्य केले आहे.

अनुभवी फिरकीपटू अमित मिश्राने कर्णधार झाल्यानंतर विराट कोहलीच्या वागणुकीत झालेल्या बदलावर मोठे खुलासे केले आहेत. २०१५ ते २०१७ दरम्यान कोहलीच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या या अनुभवी कोहली आणि रोहितचा स्वभाव, त्याचं वागणंबोलणं कसं आहे याबद्दलही भाष्य केले. अमित मिश्राने कोहली आणि रोहित शर्मा यांच्यातील फरक सांगितला.

## दिनविशेष

**घटना**

१९९६: चेन्नई - मद्रास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहराचे अधिकृतपणे चेन्नई असे नामकरण करण्यात आले

१९७६: ऑलिम्पिकस् - २१व्या स्पर्धांना कॅनडा देशात सुरवात..

१९७५: अमेरिकेचे अपोलो आणि रशियाचे सोयुझ ही दोन अंतराळयाने एकमेकांस जोडली गेली.

१९५५: डिझेलँड, कॅलिफोर्निया सुरू.

१९४७: मुंबई ते रेवस जलवाहतूक करणाऱ्या रामदास या फेरीबोटीला जलसमाधी मिळून सुमारे ७०० लोक मृत्युमुखी.

१९१७ : किंग जॉर्ज (पाचवा) यांनी फतवा काढून जाहीर केले की त्यांच्या वंशातील पुरुष मंडळी विंडसर हे आडनाव लावतील.

१८४१ : सुप्रसिद्ध पंच या विनोदी साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित.

१८१९: ॲडॅम्स-ओनिस करार फ्लोरिडा हे राज्य अमेरिकेने स्पेनकडुन ५ दशलक्ष डॉलर देऊन विकत घेतले.

१८०२ : मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले.

**जन्म**

१९५४ : अँजेला मर्केल जर्मनीच्या चॅन्सेलर

१९३० : बाबूराव बागूल दलित साहित्यिक (निधन: २६ मार्च २००८)

१९२७ : प्रोस्पेर इगो - औडस्ट्रिजडर्स लेगिओनचे संस्थापक, डच कार्यकर्ते (निधन: २३ जानेवारी २०१५ )

१९२३ : जॉन कूपर कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक (निधन: २४ डिसेंबर २०००)

१९२१ : लुई लाचेनल - अन्नपूर्णा १ शिखर पहिल्यांदा मॉरिस हेझॉग यांच्यासोबत सर करणारे फ्रेंच गिर्यारोहक (निधन: २५ नोव्हेंबर १९५५)

१९२०: गॉर्डन गूल्ड - लेसरचे शोधक (निधन: १६ सप्टेंबर २००५)

१९१९ : स्नेहल भाटकर संगीतकार (निधन: २९ मे २००७)

**निधन**

२०२०: सी.एस. शेषाद्री - भारतीय गणितज्ञ व चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक - पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (जन्म: २९ फेब्रुवारी १९३२)

२०१२ : मृणाल गोरे - समाजवादी नेत्या (जन्म: २४ जून १९२८)

२०१२ : मार्शा सिंह - भारतीय इंग्रजी राजकारणी (जन्म: ११ ऑक्टोबर १९५४)

२००५: सर एडवर्ड हीथ - युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान

२००३ : वॉल्टर झाप - मिनॉक्सचे शोधक (जन्म: ४ सप्टेंबर १९०५)

१९९२ : कानन देवी - भारतीय अभिनेत्री आणि गायिका (जन्म:

# पावसाळ्यात केस का गळतात?





पावसाळयात केस गळतीची समस्या वाढणे हे काही नवीन नाही, त्यासाठी अनेक उपाय केले जातात, पण काही फरक पडत नाही; त्यामुळे पावसाळ्यात त्वचेबरोबर केसांचीही खूप काळजी घ्यावी लागते. या दिवसांमध्ये दमट वातावरणामुळे जास्त घाम येतो. यात पावसाचे पाणी टाळूला लागल्याने टाळू तेलकट, चिकट होते. टाळूवर पावसाच्या पाण्यामुळे ओलसरपणा वाढतो. ज्याने काहीवेळी बुरशीजन्य संसर्ग होण्याची शक्यता असते.

तसेच केसांची मुळे कमकुवत होऊन केस गळणे वाढू शकते. याच विषयावर इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना नवी दिल्लीतील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलचे ज्येष्ठ त्वचारोगतज्ज्ञ डॉक्टर महाजन यांनी सविस्तर माहिती दिली आहे, तीच आपण जाणून घेऊ...

केस हवेतील जास्त आर्द्रता शोषून घेतात, ज्यामुळे केसांच्या मुळांवर परिणाम होतो. तसेच केस अधिक नाजूक बनतात, ज्यामुळे ते तुटण्याची शक्यता असते. घाम आणि हवेतील आर्द्रतेमुळे टाळू तेलकट, चिकट बनते. केसातील कोड्यांमुळे टाळूवर मुरुम आणि इतर बुरशीजन्य संसर्ग होण्याची शक्यता असते. यामुळे केसांची मुळे कमकुवत होतात. पावसाच्या पाण्यात प्रदूषक आणि अम्लीय घटक असतात, जे केसांमधील नैसर्गिक तेल काढून टाकू शकतात, ज्यामुळे केस कोरडे आणि ठिसूळ होतात.

# सुरेश वाडकर यांचं वक्तव्य, “आनंद दिघेंना पाहिलं की भीती वाटायची

प्रवीण तरडे दिग्दर्शित धर्मवीर: मुक्कामपोस्ट ठाणे या हा चित्रपट २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाचा पुढचा भाग धर्मवीर २ आता ९ ऑगस्टला प्रदर्शित होतो आहे. या चित्रपटाचा म्युझिक लाँच सोहळा पार पडला. यावेळी गायक सुरेश वाडकर यांनी आनंद दिघेंची आठवण सांगितली. मी आनंद दिघेंना पाहिलं की भीत वाटायची असं त्यांनी म्हटलं आहे आणि एक किस्सा सांगितला आहे.

धर्मवीर २ चा म्युझिक लाँच सोहळा

धर्मवीर २ या चित्रपटाचं म्युझिक लाँच सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर यांच्या हस्ते ठाण्यातील गडकरी रंगायतन इथं मोठ्या दिमाखात पार पडलं. यावेळी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, म्युझिक टीम आणि इतर मान्यवर मंडळी आवर्जून उपस्थित होती. काही दिवसांपूर्वीच लाँच करण्यात आलेल्या चित्रपटाच्या टीझरला प्रेक्षकांकडून दमदार प्रतिसाद मिळाला आहे. ‘धर्मवीर: मुक्काम पोस्ट ठाणे’ या चित्रपटाची गाणी अल्पावधीतच प्रचंड गाजली होती. त्यामुळे आता ‘धर्मवीर २’ या चित्रपटातील गाणी पाहिल्यानंतर चित्रपटाचं कथानक, कलाकार यांविषयी लोकांना खूप उत्सुकता आहे. ‘साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट’ अशा टॅगलाईनसह या सिनेमाचा टिझर आला आहे. सिनेमात काय काय असणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

सुरेश वाडकर यांनी आनंद दिघेंबाबत काय म्हटलं आहे?

” मी दिघेसाहेबांना जवळून भेटलो आहे. त्यांच्याकडे पाहिलं की मला भीती वाटायची पण ते मनाने एकदम निर्मळ होते. धर्मवीर २ हा सिनेमा ९८ आठवडे चालावा अशा मी शुभेच्छा देतो. तसंच मला इथे बोलवल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.” असं सुरेश वाडकर यांनी म्हटलं आहे.

सुरेश वाडकर यांची धर्मवीर २ च्या म्युझिक लाँचला विशेष उपस्थिती होती.

गुरुपौर्णिमा या गाण्याचं खास सादरीकरण

गुरुपौर्णिमा आणि आषाढी एकादशीच्या निमित्ताने तब्बल ४५ बाल कलाकारांनी पहिल्यांदाच धर्मवीर चित्रपटातील “गुरुपौर्णिमा” हे गीत गाऊन उपस्थितांची मने जिंकली.

## राशि भविष्य

**मेष** — तुमचा मत्सरी स्वभाव तुम्हाला खिन्न करील आणि नैराश्याने तुम्ही ग्रासाल. परंतु, ही स्वत: ओढवून घेतलेली जखम आहे. म्हणून कुणाजवळ त्याबाबत बोलण्याची गरज नाही. मत्सरावर मात करण्यास शिकण्यासाठी इतरांची सुख-दु:खे वाटून घ्या, त्यात सहभागी व्हा.

**वृषभ** — जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच. ज्या लोकांनी नातेवाइकांकडून पैसा उधार घेतला होता त्यांना ते उधार कुठल्या ही परिस्थितीमध्ये परत करावी लागू शकते. आपल्या खाजगी आयुष्याबद्दल मित्र चांगला सल्ला देतील.

**मिथुन** — तुम्ही खूपच तणावाखाली असाल तर, आपल्या मुलांबरोबर अधिक वेळ व्यतीत करा. त्यांचे प्रेमाने जवळ येणे, तुम्हाला मिठी मारणे किंवा केवळ एक निष्पाप हास्यदेखील तुम्हाला तुमच्या चिंतांपासून दूर नेईल. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो.

**कर्क** — शारिरीकदृष्ट्या तुम्हाला सक्षम राहण्यासाठी धुम्रपान करणे सोडा. जर तुम्ही घरापासून बाहेर राहून जॉब किंवा शिक्षण घेतात तर, अश्या लोकांपासून दूर राहणे शिका जे तुमचे धन आणि वेळ बर्बाद करतात. मित्रमैत्रिणींबरोबर सायंकाळ घालवणे अथवा शॉपिंग करणे तुमच्यासाठी खूपच सुखदायी आणि उत्तेजित करणारे ठरू शकते.

**सिंह** — उघडयावरचे अन्नसेवन करताना विशेष काळजी घ्या. परंतु उगाचच तणाव घेऊ नका नाहीतर तुमचा मानसिक तणाव वाढेल. आज केलेली गुंतवणूक तुमच्या समृद्धी आणि आर्थिक सुरक्षिततेला पूरक ठरेल. आपल्या खाजगी आयुष्याबद्दल मित्र चांगला सल्ला देतील.

**कन्या** — आरोग्य चांगले राहील. ग्रह नक्षत्रांची चाल तुमच्यासाठी आज चांगली नाही. आजच्या दिवशी तुम्ही आपल्या धनाला खूप सुरक्षित ठेवले पाहिजे. प्रेमातून साहचर्य आणि बॉण्डिंग तयार होईल. आपल्या प्रिय व्यक्तीशी व्यक्तिगत भावना, गुपित शेअर करण्यासाठी हा काळ चांगला नाही.

**तूळ** — मनामध्ये सकारात्मक विचार चालू ठेवा. आज तुम्ही त्या लोकांना उधार देऊ नका ज्यांनी तुमची मागील उधारी चुकवलेली नाही. कुटुंबियांच्या गरजांना प्राथमिकता द्या. त्यांच्याबरोबर आनंदी आणि दु:खी प्रसंगात सामील व्हा, तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना कळू शकेल.

**वृश्चिक** — कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो. त्यामुळे कामावर लक्ष विचलित होईल. आजच्या दिवशी गुंतवणूक करणे टाळा. नातेवाईक/मित्रमंडळी अचानक संध्याकाळी तुमच्या घरी अवतरतील आणि धमाल उडवून देतील.

**धनु** — तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यास लाभदायक दिवस. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. शांतता राहावी आणि कौटुंबिक वातावरण दूषित होऊ नये यासाठी तुम्ही रागावर मात करणे अत्यंत गरजेचे आहे.

**मकर** — क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. जे लोक पैश्याला आतापर्यंत विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे आणि धनाची बचत केली पाहिजे. मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल.

**कुंभ** — अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया नका घालवू. एक लक्षात ठेवा वादविवाद चर्चांमधून काहीही हाती लागत नाही, तर काहीतरी हरवतेच. आज तुम्ही आपले धन धार्मिक कार्यात लावू शकतात ज्यामुळे तुम्हाला मानसिक शांतता मिळण्याची पूर्ण शक्यता आहे.

**मीन** — ध्यानधारणा आराम मिळवून देईल. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात आणि अपेक्षा आहे की, ही योजना यशस्वी होईल. तुमचे जोडीदार/भागीदार तुम्हाला पाठिंबा देतील आणि मदतही करतील.

# मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेची नवी मुंबईत प्रभावी अंमलबजावणी

## १११ प्रभागांतील मदत केंद्रे तसेच २२६ अंगणवाड्यांमध्ये अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिलांनी 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यादृष्टीने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. याकरिता विविध माध्यमांतून योजनेची माहिती पात्र महिलांपर्यंत पोहचविण्यात येत आहे व त्यांच्याकडून योजनेचे अर्ज भरून घेण्याच्या कामास गती देण्यात येत आहे.

या योजनेचे महिलांकडून उत्स्फुर्त स्वागत करण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयासह ८ विभाग कार्यालय क्षेत्रातील १११ प्रभागांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या मदत कक्षांना महिलांचा उत्साही प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या सोबतच शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने चालविण्यात येणा-या २२६ अंगणवाड्यांमध्येही तेथील अंगणवाडी सेविकांकडून अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू आहे. आत्तापर्यंत ६ हजारहून अधिक महिलांनी अर्ज दाखल केले असून ३१ ऑगस्ट अर्ज भरण्याची मुदत




आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यामार्फत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकडे बारकाईने लक्ष दिले जात असून सर्व पात्र महिलांपर्यंत योजनेची माहिती पोहोचली पाहिजे व एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुसार शहरात मोक्याच्या ठिकाणी योजनेचे बॅनर्स प्रदर्शित करण्यात आले असून मोठे होर्डीग व डिजीटल होर्डीग याव्दारेही योजनेची माहिती प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच वर्तमानपत्रांसह फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू ट्यूब, व्हॉट्सॲप अशा समाज माध्यमांतूनही योजनेची माहिती सर्वदूर प्रसारित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कचरा संकलन करण्यासाठी शहरातील गल्लोगल्ली दररोज जाणा-या घंटागाड्यांवरही ध्वनीफितीव्दारे योजनेचा व्यापक प्रचार केला जात आहे आणि एनएमएमटी बसेसमधील ध्वनीक्षेपक यंत्रणेवरूनही योजनेची माहितीप्रद ध्वनीफित प्रसारित केली जात आहे.

यासोबतच समाजविकास विभागाकडील समुह संघटक आपापल्या नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील महिला बचत गटांपर्यंत पोहचून त्यांना योजनेची माहिती देत आहेत व त्यांचे अर्जही भरून घेत आहेत तसेच त्यांच्यामार्फत त्या परिसरातील इतर महिलांपर्यंत पोहचून त्यांचेही अर्ज भरून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या ४५० हून अधिक आशा वर्करही आपल्या कार्यक्षेत्रातील घरांपर्यंत पोहचून तेथील महिलांमध्ये योजनेविषयी जनजागृती करीत आहेत तसेच त्यामधील पात्र महिलांचे अर्जही भरून घेत आहेत. अशा विविध प्रकारे महिलांपर्यंत योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्यात येत आहे.

या योजनेचे ऑनलाईन अर्ज 'नारीशक्ती दूत' ॲपवरुन भरले जात असून विहित नमुन्यात ऑफलाईन लेखी अर्जही दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. पात्र महिलांना अर्ज भरणा करणे सोयीचे व्हावे याकरिता या मदत कक्षांची वेळ दोन सत्रात सकाळी ८ ते दुपारी २ तसेच दुपारी २ ते रात्री ८ अशी ठेवण्यात आलेली असून हे मदत कक्ष आठवड्यातील सर्व सातही दिवस म्हणजे शनिवार व रविवार या कार्यालयीन सुट्टीच्या दिवशीही सुरु ठेवण्यात आले आहेत. १७ जुलै रोजी मोहरम व आषाढी एकादशी या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही मदत कक्ष सुरू असणार आहेत.

# १ ते १५ जुलै दरम्यान झालेल्या सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी कारवाईत एकूण ८०३ किलो प्लॅस्टिक जप्त

ठाणे : ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील विविध प्रभागसमित्यांमध्ये गेल्या १५ दिवसांपासून सिंगल यूज प्लॅस्टिकबंदी मोहिम तीव्र स्वरुपात राबविण्यात येत आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रदुषण नियंत्रण विभाग, प्रभागसमितीमधील अतिक्रमण व निष्कासन विभागामार्फत सदरची कारवाई सुरू आहे. दिनांक १ ते १५ जुलै २०२४ या कालावधीत करण्यात आलेल्या सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी मोहिमेत ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील एकूण १३९३ आस्थापनांना भेटी देण्यात आल्या असून या अंतर्गत एकूण ८०३.२६ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून त्यापोटी एकूण ४ लाख १ हजार ४०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.




सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर टाळावा यासाठी सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी कारवाई तीव्र स्वरुपात राबविण्यात येत असून विक्रेत्यांकडे असलेला प्लॅस्टिकचा साठा जप्त करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही महापालिका कार्यक्षेत्रात नियमित सुरू राहणार असून नागरिकांनी देखील सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर करु नये असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रदुषण नियंत्रण विभाग, प्रभागसमितीमधील अतिक्रमण व निष्कासन विभागामार्फत सोमवार दिनांक १५ जुलै २०२४ रोजी विविध प्रभागसमित्यांमध्ये करण्यात आलेल्या सिंगल यूज कारवाईत २८८ आस्थापनांना भेटी देवून एकूण २५१ किलो प्लॅस्टिक जप्त करुन त्यापोटी रु. ८१ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कारवाई करण्यात आली.

वागळे इस्टेट प्रभाग समिती अंतर्गत एकूण ५६ आस्थापनांना भेटी देवून ७.५ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ६ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. वर्तकनगर प्रभाग समितीअंतर्गत एकूण २० आस्थापनांना भेटी देवून ४ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ५ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. माजिवडा मानपाडा प्रभागसमिती अंतर्गत एकूण ४० आस्थापनांना भेटी देवून एकूण १४७ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण २४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली असून सदरची कारवाई नियमित सुरू राहणार असल्याचे पर्यावरण विभागाच्या उपायुक्त अनघा कदम यांनी नमूद केले आहे.

### मंगळवारी करण्यात आलेल्या कारवाईत २५१ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिवा प्रभाग समितीअंतर्गत ५२ आस्थापनांना भेटी देवून १३ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण १० हजारांचा दंड वसूल करण्यात आला. मुंब्रा प्रभागसमितीअंतर्गत एकूण ४५ आस्थापनांना भेटी देवून ५६ किलो प्लास्टिक जप्त करुन एकूण १८ हजार ५०० रु. इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

कळवा प्रभाग समितीअंतर्गत ३५ आस्थापनांना भेटी देवून ९ किलो प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. उथळसर प्रभाग समिती अंतर्गत एकूण ४० आस्थापनांना भेटी देवून १४.५ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ९ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# How crop burning became a reason for a startup to convert agri waste into recycled products




The company's first manufacturing hub in Morena, near Gwalior, has already become cost-competitive in the market.The company's first manufacturing hub in Morena, near Gwalior, has already become cost-competitive in the market. (Express)When he was studying for a postgraduate degree in chemical engineering at the Imperial College in London, Shubham Singh read in the newspaper that Delhi had become one of the most polluted cities in the world. He didn't like this and dug deeper into the issue. "Crop burning is a very big problem in India, especially in the north. According to the Ministry of New and Renewable Energy, the country generates, on an average, 500 million tonnes (MT) of crop waste every year. In comparison, the global plastic waste generation is 300 MT annually. I already had a research background of working with sustainable material. For me, crop waste was an important opportunity. I became committed to the idea of working with crop waste," says Singh, who returned from London to Pune in 2017 after winning a grant from the Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC). In 2021, Singh and his sister, Himansha Singh, set up a company, Craste, which is attempting to solve one of the country's biggest agricultural problems by turning waste from rice, millet, sugarcane and barley, among others, into boards, used to make furniture and construction, and packaging material as alternatives to plastic. The company's first manufacturing hub in Morena, near Gwalior, has already become cost-competitive in the market. "We are ramping up, so we expect to make good revenue this fiscal," he says.

# आषाढी एकादशीनिमित्त बा पांडुरंग आणि वारकरी माऊलींना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून वंदन; भाविकांना शुभेच्छा

- राज्यात पाऊसपाणी चांगलं होऊदे,
- शेतकऱ्यांच्या घरात धनधान्याची सुबत्ता येऊदे
- मायमाऊली आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊदे
- समाजात एकजूट, बंधुत्वाची भावना कायम राहूदे
- महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी आम्हाला शक्ती दे---उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पांडुरंगाच्या चरणी साकडं



मुंबई:- बा पांडुरंगाच्या भेटीच्या ओढीनं शेकडो किलोमीटर पायी चालून आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहचलेल्या वारकरी माऊलींच्या तसंच महाराष्ट्राचं आराध्य दैवत बा पांडुरंगाच्या चरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वंदन केलं असून "राज्यात पाऊसपाणी चांगलं होऊदे, शेतकऱ्यांच्या शेतात पिकांची, घरात धनधान्याची, दुधदुभत्याची सुबत्ता येऊदे, राज्यातली मायमाऊली आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊदे, समाजातली एकजूट, बंधुत्वाची भावना कायम राहूदे, महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी आम्हाला शक्ती दे," असं साकडंही त्यांनी बा पांडुरंगाला घातलं.

आषाढी एकादशीनिमित्तानं जनतेला दिलेल्या शुभेच्छा संदेशात उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात की, पांडुरंगाची भक्ती आणि पंढरपूरची वारी ही महाराष्ट्राची शेकडो वर्षांची आध्यात्मिक, भक्तीपरंपरा आहे. सर्व जाती, धर्म, पंथांच्या वारकरी माऊलींना एकत्र आणणारी, स्त्री-पुरुष समानतेचं दर्शन घडवणारी, महाराष्ट्राच्या मातीला एकता, समता, बंधुतेचा विचार देणारी, सांस्कृतिक, वैचारिकदृष्ट्या समृद्ध करणारी पांडुरंगभक्तीची, आषाढीवारीची पताका अशीच डौलानं उंच फडकत राहूदे.

# कविवर्य नारायण सुर्वे यांच्या बंगल्यात चोरीचा प्रयत्न..

- चोराने चिठ्ठी लिहून ठेवले सर्व साहित्य जागच्या जागी...
- सुर्वे यांचे घर असल्याचे समजताच चिठ्ठी लिहून व्यक्त केला माफीनामा

कर्जत - पद्मश्री कविवर्य नारायण सुर्वे हे आपल्या वृद्धापकाळात नेरळ येथे राहायला आले होते. त्यांच्या गंगानगर भागातील बंगल्यात चोरीची घटना घडली. मात्र चोरट्याने सलग तीन दिवस चोरी करून नेलेला मुद्देमाल त्या चोरट्याने पुन्हा त्या घरात जागच्या जागी ठेवून दिला असून ८२०० रुपयांचा मुद्देमाल या चोरीच्या घटनेत चोरीला गेला असल्याची नोंद नेरळ पोलिसात करण्यात आली आहे. दरम्यान, सुर्वे यांच्या घरात राहणारे चोरी करणाऱ्या चोराने ते घर कवी नारायण सुर्वे आहे अशी माहिती मिळाल्यानंतर चिठ्ठी लिहून दिलगिरी व्यक्त केली आहे.

२००८ मध्ये कविवर्य नारायण सुर्वे आपल्या वृद्धापकाळात नेरळ येथे राहायला आले.त्यांनी जेष्ठ लेखक दिवाकर गंधे यांच्या ओळखीने गंगानगर भागात एक बंगला खरेदी केला.त्या ठिकाणी कविवर्य नारायण सुर्वे यांनी आपल्या पत्नी चे जीवनावरील पुस्तक लिहिले होते. साधारण चार वर्षे राहिल्यानंतर कविवर्य नारायण सुर्वे यांना नेरळ येथे वास्तव्यास असताना भारत सरकारने पद्मश्री देखील दिली होती.नारायण सुर्वे यांच्या पश्चात त्यांची मुलगी सुजाता गणेश घारे या त्या ठिकाणी राहत आहेत.कविवर्य सुर्वे यांच्या



जन्मदिवशी राज्यातील कवी एकत्र येतात आणि कविता वाचन तसेच अन्य कार्यक्रम सादर करीत असतात.नेरळ पूर्व भागातील स्वानंद सोसायटी मधील त्या बंगल्यात राहणारे घारे कुटुंबीय आपल्या मुलाकडे वसई येथे गेले होते.त्यानंतर रविवार १४ जुलै रोजी घरी परत आल्यावर काही वस्तूंची चोरी झाली असल्याचे लक्षात आले.त्यानंतर त्यांनी सर्व घराची पाहणी केली असता त्यांना अण्णा तथा नारायण सुर्वे यांच्या घरातील काही वस्तूंची चोरी झाली असल्याचे लक्षात आले. त्यांनतर सोमवार १५ जुलै रोजी नेरळ पोलीस ठाणे गाठून आपल्या घरात चोरी झाली असल्याची तक्रार दिली.दुपारी तक्रार मिळताच नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नेरळ पूर्व भागात गंगानगर येथील बंगल्याच्या परिसरात पोहचले.

त्यानंतर सुजाता गणेश घारे यांच्या तक्रारीनंतर नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या चोरी मध्ये पितलेची समई, पितळेचा दिवा,तांब्याची पाच ताटे,पाच तांबे,पाच लिटर तेलाची कॅन, स्टीलचे दोन नळ,टेबल पंखा आणि एक किलो तिखट मसाला असे साधारण ८२०० रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले आहे.या चोराने बंगल्याच्या खिडकी मधून प्रवेश करून टिव्ही चोरून नेला होता.मात्र नंतर ते घर कविवर्य नारायण सुर्वे यांचे असल्याची माहिती मिळताच टिव्ही पुन्हा त्या जागेवर नेवून ठेवली.तर सलग तीन दिवस चोरी साठी येणारा त्या चोराने तिसऱ्या दिवशी पुन्हा येवून आपण चोरी केली पण आपल्याला हे घर सुर्वे यांचे आहे याची माहिती असती तर चोरी केली नसती असे चिठ्ठी लिहून ठेवली.आणि त्या चिठ्ठी मध्ये सॉरी असे लिहून ठेवले आहे.

मात्र त्या चोरावर ८२०० रुपयांची चोरी केल्या प्रकरणी नेरळ पोलिसांनी १५६ / २०२४ नुसार गुन्हा दाखल केला असून भादवी कलम २०२३चे ३३१(३),३३१(४),३०५ नुसार तपास सुरू आहे.नेरळ मधील सीसीटिव्ही कॅमेरे यांचे तपासणी करून चोराला पकडले जाईल अशी माहिती पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी दिली आहे.

# Delhi lawyers hold protest against new criminal laws, abstain from work

New Delhi - lawyers protestA statement by the Delhi Bar Association (DBA) underlined that there shall be "complete abstinence" from work on July 12 to protest against the circular passed by the administrative civil judge. (Express Photo)



Citing "draconian" provisions of the three new criminal laws such as the extension of maximum police custody of an accused up to 90 days (as opposed to the earlier limit of 15 days), lawyers across Delhi abstained from work to register their protest.

Resolutions were passed by the New Delhi Bar Association (NDBA), and the Shahdara Bar Association, among others, as they requested judicial officers not to pass any adverse orders on Monday. Various lawyers gathered outside the Patiala House Court complex with placards to register their resentment against the new laws.

Earlier, on Friday, some lawyers went on a strike, highlighting a "draconian" order passed by an administrative civil judge, which allegedly restricted the entry and exit of any repair material in the lawyers' chambers without the prior approval of the caretaking branch.

A statement by the Delhi Bar Association (DBA) underlined that there shall be "complete abstinence" from work on July 12 to protest against the circular passed by the administrative civil judge.When asked about the strike by lawyers in Delhi, Union Law Minister Arjun Ram Meghwal said that the three new criminal laws were passed after "proper consultation".

# 3 pilgrims, 2 men killed in bus-tractor crash on Mumbai-Pune Expressway

Mumbai Pune expressway bus accident, pilgrims killedThe tractor was on the wrong side of the Pune lane of the expressway when it came in the way of the speeding bus, which, while attempting to overtake another vehicle, lost control and crashed onto the rear of the tractor, the police said. (Express photo)



Three pilgrims and two men were killed and several others injured after a luxury bus carrying members of the Warkari community collided with a tractor and fell into a gorge on the Mumbai-Pune Expressway early on Tuesday.

According to the police, the bus was on its way to Pandharpur when it collided with a tractor coming from the wrong side and broke through the left-side railing, overturned, and fell into a 15-feet deep gorge. The bus was carrying Warkaris from Dombivli and Kalyan, mostly senior citizens, for the Ashadhi Ekadashi celebrations in Pandharpur, they added. Senior police officials, including Vivek Pansare, DCP, visited the accident site. "It is a tragic incident, and our hearts go out to the families of those who lost their lives. We will conduct a thorough investigation to understand the cause of the accident and take necessary actions to prevent such incidents in the future," said Pansare.

The tractor was on the wrong side of the Pune lane of the expressway when it came in the way of the speeding bus, which, while attempting to overtake another vehicle, lost control and crashed onto the rear of the tractor, the police said. The bus then dragged the tractor for 100 feet and split it into two pieces, killing the tractor driver, Tarvez Salauddin Ahmed, 28, and an unidentified person on that vehicle on the spot.

# शिरोळ तालुक्यातील क्षारपड जमीन सुधारणा

## प्रस्ताव तातडीने सादर करावा -उपमुख्यमंत्री अजित पवार

● मुंबई, (प्रतिनिधी):

मुंबई :- शिरोळ तालुक्यातील क्षारपड जमिनींचा पोत सुधारून त्या लागवडी योग्य बनविणे गरजेचे आहे. क्षारपड जमिनी सुधारणा निचरा तंत्रज्ञान उपयुक्त ठरत असल्याने यासाठीचा आवश्यक प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेसाठी तातडीने पाठवावा. या आराखड्यास प्रशासकीय मान्यतेसह आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यातील क्षारपड व पाणथळ क्षेत्र सुधारण्यासाठी प्रस्तावित योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या



अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, लाभक्षेत्र विकास सचिव डॉ. संजय बेलसरे, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय पुणेच्या अधीक्षक अभियंता तथा संचालक वैशाली नारकर आदी उपस्थित होते.

■ उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, क्षारपड जमीन सुधारणा काम लोकोपयोगी व शेतकरी हिताचे आहे. या कामातून नापिक जमीन लागवडीखाली येणार असल्याने शेतकऱ्यांना त्याचा निश्चित लाभ होणार आहे. त्यामुळे शिरोळ तालुक्यातील क्षारपड जमीन सुधारणेचा प्रस्ताव सादर करताना तो परिपूर्ण सादर करावा. यामध्ये सबंधित शेतकरी हिस्सा १० टक्के, सबंधित सहकारी साखर कारखाना १० टक्के हिस्सा याबाबतची संमतीपत्र यांचा समावेश असावा.

■ या बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पर्जन्यमान, नद्यांची पाणी पातळी, धरणांमधील पाणी साठा याबाबतचा आढावा कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री.येडगे यांच्याकडून घेतला.

## नागालँडच्या आर्थिक विकासासाठी टिझू झुंकी नदीचा वापर मालवाहू आणि प्रवासी वाहतूक सक्षम करण्याची ग्वाही:सर्बानंद सोनोवाल

● मुंबई, (प्रतिनिधी):




नागालँडची जलमार्ग क्षमता सक्षम करण्याच्या उद्देशाने प्रमुख उपक्रमांची घोषणा आज केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी भागधारकांच्या परिषदेत केली. यावेळी नागालँडचे मुख्यमंत्री नेफियु रिओ आणि मंत्री सोनोवाल यांनी टिझू झुंकी (राष्ट्रीय जलमार्ग क्र. १०१) नदीच्या विकासाचीही घोषणा केली. त्याचबरोबर नौकापरिवहन व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण (आयडब्ल्यूएआय) आणि नागालँड सरकारचा परिवहन विभाग एकत्र काम करणार असल्याचे सांगितले.

रिओ आणि सोनोवाल यांनी अफाट पर्यटन क्षमता असलेल्या डोयांग नदी सरोवराचा विकस करण्यासाठी समुदाय जेटी तसेच रो-पॅक्स फेरीच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी पुढाकार घेण्याची घोषणा केली. त्यामुळे राज्याच्या पर्यटन क्षमतेला चालना मिळणार आहे.

# गद्दार सरकारला हरवून राज्यात परिवर्तन अटळ आहे - आदित्य ठाकरे

● कर्जत , (प्रतिनिधी):

महाराष्ट्र राज्यातील घटनाबाह्य सरकार उलथवून टाकायचे आहे आणि गद्दार सरकार हरवून राज्यात परिवर्तन करायचे असा असा निर्धार युवासेना प्रमुख शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.पक्षप्रमुख उध्दव ठाकरे हे कोणालाही फसवू शकत नाही असे महाराष्ट्र राज्यातील जनतेला वाटत आहे आणि त्यामुळे राज्यातील जनता महाविकास आघाडीचे सरकार आणल्या शिवाय राहणार नाही असा निर्धार आदित्य ठाकरे यांनी या सभेत व्यक्त केला.

कर्जत विधानसभा मतदारसंघ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा शिवसंवाद सभेचे आयोजन केले होते.यावेळी पुढे बोलताना शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी काय बोलायचे काही कळत नाही, कारण आपण लढलो आणि जिंकल्यातच जमा होते.काल मुंबई येथे आदी शंकराचार्य आले होते आणि त्यांचे आशीर्वाद मिळाले आहेत.त्यावेळी शंकराचार्य



यांनी सर्वात मोठे पाप हे विश्वासघात असतो आणि जो विश्वासघात करतो ते धर्मात टिकत नाहीत असे सांगितले होते.काल शंकराचार्य यांचे आशीर्वाद घेतले असून आज जनता जनार्दन यांचा आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे.आपण या मतदारसंघात हरलो आहोत,पण आपण जिंकलो आहोत असे समजा कारण देशात मोदी सरकार नाही तर तेथे बसलेले सरकारने एन डी ए चे सरकार बनले आहे.हे २७२ पार झाले असते तर त्यांनी आपल्या घरावर बुलडोझर फिरवला असता असे बोलत आदित्य ठाकरे यांनी जनतेने लोकशाही वाचविण्याचे काम केले आहे.लोकशाही वाचविण्याचे पुढचा महत्वाचा टप्पा हा महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आहे असे सांगून देशात आपण इंडिया आघाडी २३७ आहे.देशात आकडे कधीही बदलू शकतात असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला.

हे घटनाबाह्य सरकार पायउतार झाल्याशिवाय मी त्यांना कायम घटनाबाह्य म्हणणार आहे असा ठाम विश्वास व्यक्त करून आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. जगातील नवव्या क्रमांकाचा मोठा पक्ष महाराष्ट्रात ९ वर येवून ठेवला आहे.हा सर्व चमत्कार मतदार राजा करू शकतो असे सांगून महविकास आघाडीचे सरकार आणून परिवर्तन करायचे आहे. देशातील अनेक राज्याचे मुख्यमंत्री देशाच्या आपल्या आर्थिक राजधानीत मुंबई मध्ये येतात. मात्र आपल्या राज्याचे मुख्यमंत्री कोणत्या राज्यात गेले का?एखादा उद्योग आणण्यासाठी असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला.त्यांनी देशाचे पंतप्रधान यांच्याकडे महाराष्ट्र राज्यासाठी कधी काही मागितली आहे काय? असा सवाल यावेळी ठाकरे यांनी केला.

शिवसेना उप नेते आमदार सचिन अहिर यांनी मुंबई पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात विजय मिळवून विधानसभा काबीज करण्यासाठी शिव संवाद मधील पहिली जाहीर सभा कर्जत येथे घेत असून संपूर्ण राज्यात असे मेळावे घेतले जाणार आहेत. आपल्या कडे लोकसभा निवडणुकीत गमतीजमती करणारे आपल्या पक्षात देखील आहेत आणि आजच्या व्यासपीठावर उपस्थित आहेत. लोकसभा निवडणुकीत केलेले चुकीचे काम यांच्याबाबत योग्य निर्णय होईलच असे आश्वासन सचिन अहिर यांनी यावेळी दिले.प्रत्येकाला निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे,त्यामुळे पाय खेचण्याचा प्रयत्न कोणी करू नये असे आवाहन अहिर यांनी केले. मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी टेबलावर नाचलेल्याला पराभूत केल्या शिवाय रहायचे आहे. आता सध्या लावणी सुरू असून नोव्हेंबर मध्ये मतांची कापणी आपल्याला करून आपल्या पक्षाचा मतदार विधानसभेत पाठवायचे आहेत असा निर्धार यावेळी व्यक्त केला.तर उप जिल्हा प्रमुख नितीन सावंत यांनी प्रास्ताविक करताना मावळ लोकसभा साठी १७५७६मतांची आघाडी देणाऱ्या मतदारांचे आभार मानण्यासाठी आदित्य ठाकरे आले आहेत असे सांगितले.किरवली येथील शेळके मंगल कार्यालयात सभेला त्यावेळी शिवसेना उपनेते आमदार सचिन अहिर,उप नेत्या आणि मुंबई महापालिकेच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, मावळ लोकसभा मतदारसंघ संघटक संज्योग वाघेरे,जिल्हा संपर्क प्रमुख बबन पाटील,महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी,सह संपर्क प्रमुख भाई शिंदे,खालापूर तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे,कर्जत तालुका प्रमुख उत्तम कोळंबे,जिल्हा

# 'कशाला गाता विकासाचे गाणे, खड्ड्यांत गेले ठाणे' मनसेचे खड्ड्यांवरुन लक्षवेधी आंदोलन..

● ठाणे , (प्रतिनिधी):

ठाण्यातील घोडबंदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याचे पाहायला मिळतयं, पावसाळा असो वा नसो मात्र ठाण्याच्या घोडबंदर रस्त्यावर खड्डे पडल्याचे दिसतात. सोमवारी सायंकाळी ठाणे शहर मनसेच्या वतीने घोडबंदर भागातील रस्त्यांवरील खड्डे प्रश्नी तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी 'कशाला गाता विकासाचे गाणे, खड्ड्यांत गेले सगळेच ठाणे', 'महापालिका आयुक्त हाय हाय' अशा स्वरुपाच्या घोषणा देत प्रशासनाचे डोळे उघडण्याचा प्रयत्न मनसेने केला.

माजिवडा, कापूरबावडी, मुंबई- नाशिक महामार्ग असेल किंवा घोडबंदरचा रस्ता असेल, या सर्वच रस्त्यांवर खड्डेच खड्डे आहेत. घोडबंदर मार्गावर सध्या मेट्रोचे काम सुरू आहे. येथील रस्त्यांचे काँक्रीटचे काम ऐन पावसाळयात सुरू झाले आहे.

तीन दिवसांपूर्वी घोडबंदर रस्त्याची महापालिका आयुक्त सौरभ राव यानी संबंधित प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याऱ्यांबरोबर पाहणी केली होती. त्यानंतर तत्काळ रस्त्यांना पडलेले खड्डे बुजविण्याचे आदेशही दिले होते. रस्त्यांना पडलेल्या खड्यांसंदर्भात त्यानंतर पावसाची उघडीप मिळाल्यावर खड्डे दुरुस्तीची मोहीम हाती घेतली जाईल, असे आश्वासन संबंधित प्राधिकरणाने दिले होते. या खड्यांविरोधात मनसे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळतेय.

वेदांत हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर मनसे शहरप्रमुख रवींद्र मोरे यांनी समर्थकांसह सोमवारी आंदोलन केले. यावेळी खड्ड्यांत बसून पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाविरोधात घोषणबाजी केली.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी 'कशाला गाता विकासाचे गाणे, खड्यांत गेले सगळेच ठाणे, 'महापालिका आयुक्त हाय हाय' अशा घोषणाबाजी देत आंदोलन केले. घोडबंदर भागात रस्त्यांना खड्डे पडले असतांना आयुक्त एसीत बसले आहेत. याच खड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. दुचाकीचालक गंभीर जखमी होत आहेत. त्याला जबाबदार कोण, यावर उपाय करण्यात यावेत अन्यथा मनसे स्टाईलने आणखी तीव्र आंदोलन

# गुटखा विक्रीसह बेशिस्त वाहतुकीला लगाम -विकास नाईक..

● बोईसर, (प्रतिनिधी):

शहरात गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत असून यामध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश अधिकाधिक दिसून येत आहे. विशेष म्हणजे शहरात वाढलेल्या अमली पदार्थांच्या तस्करीमुळं लहान मुलांचे यात अडकण्याचे प्रमाणही वाढत चाललं आहे. अशातच अमली पदार्थांच्या सेवनातून गुन्हेगारी कारवाया वाढत असून आत्तापर्यंत ड्रग्सच्या आहारी गेलेल्या तरुणांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. अल्पवयीन मुलांमध्ये सिगारेट पान मसाला, गुटखा यासारख्या व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढत असून शाळा, महाविद्यालय, रुग्णालय तसेच सार्वजनिक ठिकाणावर धूम्रपान बंदी लागू करण्यात आली आहे. मात्र या गुटखा आणि धूम्रपान बंदीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होताना दिसून



येत आहे.

महाराष्ट्र राज्यात शासनाने १८ वर्षांखालील बालकांना सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यास बंदी केलेली आहे. असे टपरीचालक ही उत्पादने १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या अल्पवयीन बालकांना विक्री करताना दिसून येतात.दरम्यान या पार्श्वभूमीवर बोईसर शहरात विविध टपरी चालकांकडून विद्यार्थ्यांना या पदार्थांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. बोईसर येथील सरोवर हॉटेल या ठिकाणी सर्व टपरीचालकाना बोलवून विभागीय पोलिस अधिकारी विकास नाईक संयुक्त सभा घेऊन अम्लीय पदार्थ विक्री करणाऱ्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. ग्रामपंचायत हद्दीतील टपऱ्या हटविण्याकरता ग्रामविकास अधिकाऱ्याची खूप मोठी कसोटी लागलेली असून काही टक्केवारीत अडकलेले सदस्य याठिकाणी विरोध करत असताना मधुर नाक्यावरील संजीवनी इस्पितळालघत असलेल्या टपऱ्या हटविण्याचे काम सरावली ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच आनंद धोडी यांनी केलेले असून इतर ग्रामपंचायतीचे सरपंच अम्लीय पदार्थ विक्री करणाऱ्या टपऱ्या हटवणार आहे

# उच्च शिक्षणाला नवीन संदर्भ प्रदान करणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी या विषयावर खोलेश्वर महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

● मुंबई, (प्रतिनिधी):

"नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे उच्च शिक्षणाला नवीन संदर्भ प्रदान करणारे आहे," असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगरचे मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके यांनी केले. ते डॉ. बा.आं. म. विद्यापीठ, संभाजीनगर आणि खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी" या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे उपस्थित होते तर मंचावर उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. गोपाळराव काकडे, भा.शि. प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा खोलेश्वर महाविद्यालयीन विकास समितीचे



अध्यक्ष श्री. राम कुलकर्णी आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

शुक्रवार दि.११ जुलै २०२४ रोजी खोलेश्वर महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, केज, धारूर, माजलगाव, परळी व वडवणी तालुक्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, एन.ई.पी. प्रमुख अपेक्षित होते. एकूण १६० जणांनी या कार्यशाळेत आपला सक्रिय सहभाग नोंदविला.


प्रारंभी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यशाळेस सुरुवात झाली. केंद्र शासन तथा महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाच्या विविध परिपत्रकांचा दाखला देत डॉ. संजय साळुंके पुढे बोलताना म्हणाले की नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्राध्यापक, प्राचार्य व संस्थाचालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने यावर्षी प्रथम वर्षाला प्रवेश देताना विद्यार्थ्यांनी घ्यावयाचे विषय, विद्यापीठाने बकेट मध्ये दिलेले विषय, कौशल्याधारित विषयांची निवड या अनुषंगाने मार्गदर्शन करताना प्राध्यापकांच्या येणाऱ्या कार्यभाराविषयीची समस्या, वेळापत्रकाविषयीची समस्या याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित असून विविध कौशल्यांना वाव देणारे व व्यवसायाभिमुख कौशल्याधारित




ठाणे - ठाण्यातील इंडो स्कॉट्स ग्लोबल स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त विठूरायाची साकारण्यात आलेली सुंदर रांगोळी.

# डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने विविध वृक्षांची लागवड !

● वासिंद, (प्रतिनिधी):



डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने येथील खातिवली वनपरिक्षेत्रात जवळपास ६०० विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. महाराष्ट्र भूषण डॉ.श्री नाना साहेब धर्माधिकारी यांच्या पुण्य स्मरणार्थ निमित्ताने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा या प्रतिष्ठानच्या वतीने तसेच पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉ.अप्पासाहेब धर्माधिकारी व महाराष्ट्र भूषण सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनातून वृक्ष लागवड व संवर्धन अभियान राबविण्यात आले. या अनुषंगाने येथील श्री सदस्यांनी पुढाकार घेऊन शहापूर वनक्षेत्रामधील वासिंद परिमंडळात असलेल्या खातिवली येथील वनक्षेत्रात कडुलिंब, वड, पिंपळ, कांचन, उंबर, करंज, वेहळा, आवळा, शिसव, जांभुळ, बहावा या वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात वासिंद, कसारा, खडावली व आसनगाव परिसरातील साधारण ४०० ते ५०० श्री सदस्यांनी सहभाग घेऊन वृक्ष लागवडीसाठी परिश्रम घेतले. यावेळी शहापूर वनक्षेत्र अधिकारी शैलेश गोसावी, वनरक्षक प्रशांत दसरे आदी वन कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. तर शहापूर उपवन सरक्षक सचिन रेपाळे यांनी व्हिडिओ कॉल द्वारे कार्यक्रमात सहभाग दर्शविला.